क्रमांक : ४

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१९ / माघ २९, १९४० शके

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**४.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते कि, सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) सत्र शुक्रवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित **२९** निवेदनांपैकी **२६** निवेदने आता शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित **३** निवेदने प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या प्रती सर्व संबंधित सन्माननीय विधानसभा सदस्यांना वितरीत करण्यात येतील.

**विधान भवन**,
मुंबई,
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०१९.

**सचिव (कार्यभार)**
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

1. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
2. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
3. संगणक कक्ष (website.)

\\Mls१०१\e\Bull Part २\BULL PART YEAR २०१९.docx

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

## महाराष्ट्रविधानसभा

## सन २०१८ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**डॉ.सुनिल देशमुख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे.

"अमरावती शहरामध्ये दिनांक १८ नोव्हेंबर, २०१८ रोजी वलगाव रोडवरील हजरत बिलाल नगर येथे चोरटयांनी दरोडा घालुन घरामध्ये एकट्या असलेल्या वृध्द व अपंग महिला ताहेरा बानो यांचा खुन करणे, दि.१९ नोव्हेंबर, २०१८ रोजी शहरातील शारदा नगर येथे व्यापारी निलेश टावरी यांच्या घरी मध्यरात्री चोरट्यांनी दरोडा घालुन अर्धा किलो सोन्यासह ९ किलो चांदी असा एकुण ३० लक्ष किमतीचा ऐवज चोरुन नेणे, त्याचप्रमाणे दि. ४ नोव्हेंबर, २०१८ रोजी बडनेरा येथील आरको गॅरेजमध्ये अन्न व औषधी विभाग प्रशासनाने ४६ लक्ष रु.किमतीचा प्रतिबंधीत गुटखा जप्त करणे व अवैध गुटखा व्यवसायाच्या खऱ्या सुत्रधारापर्यंत न पोहचताच थाथुरमातुर कारवाई करुन पोलीसप्रशासनाव्दारे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होणे, शहरात खुलेआम सट्टा मटका या अवैध धंद्यांना आलेले उधाण, अवैध दारु विक्रीच्या धंद्यात झालेली भरमसाठ वाढ, शहरात व जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात वाळु तस्कर व वाळु माफींयातर्फे होणारा वाळुचा अवैध व्यापार, या वाळु तस्करीमुळे वाढलेले मनोबलातुन तहसीलदाराच्या वाहनावर वाळुचा ट्रक घालुण जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, शहराबाहेरील परवानाधारक ऑटोरिक्शा अनधिकृतपणे शहरातील रस्त्यांवर धावणे, यामुळे शहरातील वाहतुक व्यवस्थेचा बोजवारा उडणे, यावर वाहतुक विभागाची कोणतीही कारवाई न होणे, एकंदरीतच एकाऐकी जबरी चोरी, घरफोडी, हत्या, अवैध गुटखा, अवैध दारु, सट्टामटका यामध्ये झालेली वाढ, या अवैधव्यवसाय वाढीमुळे गुन्हेगारांकडे मोठ्या प्रमाणात संपत्ती निर्माण होणे, गुन्हेगांराच्या मनोधैर्यात वाढ होणे, त्याव्दारे संघटीत गुन्हेगारीला चालना मिळणे, अवैध व्यवसायावर पोलीसप्रशासनाची पकड ढिली होणे पर्यायाने चोरी, घरफोडी, खुन, ह्या घटनांमध्ये झालेली वाढ, परिणामी नागरीकांच्या जीवाला निर्माण झालेला धोका, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

अमरावती शहरातील आसीर कॉलनी येथे अज्ञात आरोपीने दिनांक १८.११.२०१८ रोजी सकाळी १०.३० ते १३.३० च्या दरम्यान एका वृद्ध महीलेचा चोरी करण्याच्या उद्देशाने खून केल्याचे निदर्शनास आलेवरून फिर्यादीच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरोधात पोलीस स्टेशन, गाडगेनगर येथे अप.क्र. ११७६/२०१८ भादंवि कलम ३०२, ३९२, ३९४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासावर आहे.

फिर्यादी निलेश नारायणदास टावरी, रा. शारदा नगर नं.२ यांनी चोरट्याने त्यांचे बंद घर फोडून घरातील सोने, चांदी, नगदी रोकड आणि घराच्या कंपाऊंडमधील ॲक्टीव्हा गाडी सह एकूण सुमारे ७,११,०००/- रूपयांचा ऐवज चोरून नेल्याच्या तक्रारीवरून एका आरोपीविरोधात राजापेठ पोलीस स्टेशन येथे अप.क्र. ८२६/२०१८ भादंवि कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात एका संशयित आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

दिनांक ३/११/२०१८ रोजी फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन , म.रा. अमरावती यांनी दिलेल्या तक्रारीवरून बडनेरा रोडवर बेलोरा येथील आर्को गॅरेजच्या मागील बाजूस असलेल्या गोदामात तपासणी केली असता तेथे प्रतिबंधीत अन्न पदार्थ सुंगधीत तंबाखू आणि पानमसाल्याचा सुमारे ३१,२६,०००/- रूपयांचा साठा मिळून आल्याने एका आरोपीविरोधात पोलीस स्टेशन, बडनेरा येथे अप.क्र. ७०३/२०१८ कलम १७९, १८८, २७२, २७३, ३२८ भादंवि सह कलम ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.तसेच दिनांक ४/११/२०१८ रोजी फिर्यादी अन्न सुरक्षा

ROTA | H 1256 (800-12-2018) - 1

(कृ.मा.प.

अधिकारी, अन्न व औषध प्रशासन , म.रा. अमरावती यांनी दिलेल्या तक्रारीवरून बडनेरा रोडवर बेलोरा येथील आर्को गॅरेजच्या मागील बाजूस असलेल्या गोदामात तपासणी केली असता तेथे प्रतिबंधित अन्न पदार्थ गोवा, जि-१ ,सेव्हन स्टार , क्रिस्टल, हॉट या ब्रँडचा सुमारे १३,२०,०००/- रूपयांचा साठा मिळून आल्याने दोन आरोपीविरोधात पोलीस स्टेशन, बडनेरा येथे अप.क्र. ७०४/२०१८ कलम १८८, २७२, २७३, ३२८ भादंवि सह कलम ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.

रेतीने भरलेला ट्रक तपासणी करीता न थांबविता शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याच्या उद्देशाने तहसिलदार यांच्या वाहनास ठोस देवून त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणून ट्रक क्र.एमएच २७-बीएक्स ०२९० या ट्रकच्या चालक व मालक यांचे विरुध्द पोलीस स्टेशन तळेगांव दशासर येथे भादंवि ३०७, ३३२, ३५३, ३८६, ३४ व मोटर वाहन कायदा कलम १८४ अन्वये दिनांक १९/११/२०१८ रोजी गुन्हा दाखल केला आहे. घटनास्थळावरील आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. ट्रकच्या मालकास दिनांक २१/११/२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

अवैध जुगाराबाबत माहे ऑक्टोबर २०१८ अखेर ३७१ केसेस दाखल करण्यात आल्या असून ८२४ अरोपींना अटक करण्यात आली आहे. तर रु.३९,५२,०८७/- इतक्या रकमेचा माल जप्त करण्यात आला आहे.

अवैध दारू बाबत माहे ऑक्टोबर २०१८ अखेर ९७९ केसेस दाखल करण्यात आल्या असून १००४ अरोपींना अटक करण्यात आली आहे. तर रु. २५,२१,०१६/-इतक्या रकमेचा माल जप्त करण्यात आला आहे.

अंमली पदार्थ अधिनियम अंतर्गत माहे ऑक्टोबर २०१८ अखेर ६ केसेस दाखल करण्यात आल्या असून ११ अरोपींना अटक करण्यात आली आहे. तर १५३.५३ कि.ग्रॅ. (रू. २,३५,५४४/-) मुद्देमाल जप्त करण्यात इतक्या रकमेचा माल जप्त करण्यात आला आहे.

चालू वर्षात अवैध दारु विक्रेत्याविरुध्द मुंबई दारूबंदी कायदा कलम ९३ अन्वये प्रतिबंधक कार्यवाही केल्यामुळे अवैध दारु व्यवसाय करणाऱ्याचे प्रमाण घटलेले आहे.

मालमत्ता व शरीराविरुध्दच्या गुन्ह्यांसंदर्भात सन २०१८ च्या ऑक्टोबर पर्यंत २०३५ केसेस दाखल झाल्या आहेत. सन ऑक्टोबर २०१८पर्यंत ४७६१ प्रकरणात प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

चालु वर्षात घरफोडीच्या गुन्ह्यात घट झालेली असून गुन्ह्यात झालेली वाढ रोखण्याकरीता उपाययोजना म्हणून पोलीस आयुक्तालयातर्फे अमरावती शहर हद्दीत एकुण १० सि.आर. मोबाईल, २ महिला पेट्रोलिंग मोबाईल, ७ दामीनी पथके, एकूण चार्ली १२ (२४ कर्मचारी) तसेच पोलीस स्टेशनची दुय्यम मोबाईल ह्या २४ तास पेट्रोलींग, सायंकाळी पायी पेट्रोलींग, कोबींग गस्त नाकाबंदी राबविण्यात येत आहे.

शहर वाहतुक शाखेमार्फत वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरुध्द सन २०१८ माहे ऑक्टोबर पावेतो २६८४० केसे दाखल करण्यात आल्या असून त्यांचेकडून ६०,६८,५००/- रुपये दंड स्वरुपात वसूल करण्यात आला आहे. अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनांवर वाहतुक विभाग अमरावती शहर च्या वतीन एकूण ६१ वाहनावर कारवाई करण्यात येवून त्यांचेकडून एकूण ९९,५००/- रुपये दंड स्वरुपात वसूल करण्यात आला आहे.

पोलीस प्रशासनामार्फत अवैध व्यावसायिकांविरुध्द वेळोवेळी प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन अशा गुन्ह्यांना आळा घालण्यात आला आहे. तथापि याबाबत विधानसभा सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना निर्देशित करण्यात येत आहे.

******

H 1256-14.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०१८ चे तृतीय(हिवाळी)अधिवेशन

सर्वश्री.राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार,मो.अरिफ नसीम खान, अमित देशमुख,अमीन पटेल, त्र्यंबकराव भिसे, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री.सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ.संतोष टारफे, श्री.अब्दुल सत्तार,ॲड.यशोमती ठाकूर,श्री.सुभाष पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना

## लक्षवेधी सूचना

"शासनाची हमीभावाने खरेदीसाठी नोंदणी सुरु असताना बाजारात मात्र शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत असल्याची बाब ऑक्टोबर,२०१८ मध्ये निदर्शनास येणे, खानदेशात मूग आणि उडदाची ७० ते ८० टक्के,मराठवाड्यात ५० टक्के तर, वऱ्हाडातील बुलढाणा,वाशिम आणि अकोला जिल्ह्यात ४० टक्क्यापर्यंत झालेली विक्री,या तिनही विभागातील शेतकऱ्यांना बाजारात मूग व उडीद विक्रीतून सुमारे ३३० कोटी रुपयाचा तोटा सहन करावा लागणे, केंद्र शासनाने मुगाला ६९७५ रुपये तर उडदाला प्रति क्विंटल ५६०० रुपये जाहिर केलेला हमीभाव,खानदेशात सुमारे ७५ ते ८० टक्के मूग आणि उडदाची खाजगी बाजारात शेतकऱ्यांनी केलेली विक्री, त्यामुळे २५ कोटीचा बसलेला फटका, खानदेशात धुळे,नंदूरबार आणि जळगांव जिल्ह्यात मुगाची ५५ हजार हेक्टरवर झालेली पेरणी, या तिनही जिल्ह्यात १ लाख १८ हजार क्विंटल पर्यंत मुगाचे उत्पादन झाल्याची कृषी विभागाने दिलेली माहिती,यातील ८० टक्के मुगाची विक्री झाल्याची बाजार समितीकडून मिळालेली माहिती,यामध्ये मुगाला ३८०० रुपयाचा दर मिळाल्याने २३ कोटी रुपयांचे झालेले नुकसान, वऱ्हाडात बुलढाणा,अकोला,वाशिम या तीन जिल्ह्यामध्ये ४० टक्के मूग व उडदाची झालेली विक्री,यामध्ये ३३ कोटींचा शेतकऱ्यांना बसलेला फटका,मराठवाड्यात यावर्षी मूगाचे ६ लाख ६० हजार क्विंटल तर,उडदाचे ६ लाख ४८ हजार क्विंटल झालेले उत्पादन,यातील ५० टक्के मूग व उडदाच्या झालेल्या विक्रीतून शेतकऱ्यांना १३१ कोटीचा झालेला तोटा,याप्रकरणी शासनाने वेळीच उपाययोजना करण्याची आवश्यकता,याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

## मा.मंत्री (पणन) यांचे निवेदन

हंगाम २०१८-१९ मध्ये राज्यात तुर व उडीदाची नाफेडच्यावतीने हमीभावाने खरेदी करण्यासाठी पणन महासंघ, मुंबई व विदर्भ पणन महासंघ, नागपूर या संस्थाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती केली असून दिनांक २५/०९/२०१८ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरु करण्यात आली आहे. या अंतर्गत मूग उत्पादक जिल्ह्यामध्ये प्राधान्याने सुरुवात करण्यात आली असून, हंगामाच्या सुरुवातीस येणारा माल नॉन एफएक्यु दर्जाचा असल्याने खानदेश,मराठवाडा व वऱ्हाडातील बाजार समित्यांमध्ये सदर मालाला किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी बाजारभाव मिळाला आहे.

हंगाम २०१८ मध्ये केंद्रशासनानें जाहिर केलेल्या किमान आधारभूत किंमती पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | पिक | किमान आधारभूत किंमत |
|---|---|---|
| १ | मूग | ६९७५ |
| २ | उडीद | ५६०० |
| ३ | सोयाबीन | ३३९९ |
| ४ | तूर | ५६७५ |
| ५ | कापूस (मध्यम धागा) | ५१५० |
| ६ | कापूस (लांब धागा) | ५४५० |

खानदेशातील मूग उत्पादक जिल्ह्यांमध्ये बाजार समित्यांमध्ये नॉन एफएक्यु दर्जाच्या मालाची खरेदी शेतकऱ्यांच्या संमतीने व्यापाऱ्यांनी केलेली आहे.

चालू हंगामात धुळे, जळगांव, नंदूरबार, या जिल्ह्यांमध्य मुग व उडीदाची झालेली पेरणी व अपेक्षीत उत्पादन पुढीलप्रमाणे आहे:-

(क्षेत्र-लाख हेक्टरमध्ये,उत्पादन लाख क्विंटलमध्ये)

| जिल्हा | मूग | | उडीद | |
|---|---|---|---|---|
| | लागवडीचे क्षेत्र | उत्पादन | लागवडीचे क्षेत्र | उत्पादन |
| धुळे | १३२ | ४१७ | ५४ | ३२९ |
| नंदूरबार | ७२ | ५५० | १०९ | ६०० |
| जळगांव | २६१ | ५५० | २३१ | ५५ |

तसेच वऱ्हाडातील बुलढाणा, अकोला, व वाशिम या जिल्ह्यातील मुग व उडीदाच्या लागवडीखालील क्षेत्र व अपेक्षित उत्पादन पुढीलप्रमाणे आहे:-

(क्षेत्र-लाख हेक्टरमध्ये,उत्पादन लाख क्विंटलमध्ये)

| जिल्हा | मूग | | उडीद | |
|---|---|---|---|---|
| | लागवडीखालील क्षेत्र | उत्पादन | लागवडीखालील क्षेत्र | उत्पादन |
| बुलढाणा | १८५ | ७०० | २०७ | ७५० |
| अकोला | ३०७ | ४०५ | २३९ | ३४८ |
| वाशिम | १०१ | ५०० | १३५ | ५५० |

त्याचबरोबर मराठवाड्यातील जिल्ह्यांमधील मूग व उडीदाच्या लागवडीखालील क्षेत्र व अपेक्षित उत्पादन पुढीलप्रमाणे आहे:-

(क्षेत्र-लाख हेक्टरमध्ये,उत्पादन लाख क्विंटलमध्ये)

| | मूग | | उडीद | |
|---|---|---|---|---|
| | लागवडीखालील क्षेत्र | उत्पादन | लागवडीखालील क्षेत्र | उत्पादन |
| औरंगाबाद | १३२ | १७५ | ५३ | २०० |
| जालना | २५७ | १५८ | १०७ | ५२२ |
| परभणी | २४३ | १८० | ८१ | २२५ |
| हिंगोली | ८५ | ५२० | ६५ | ५३० |
| बीड | २३९ | ३०० | २४१ | ३०० |
| उस्मानाबाद | २७९ | २६० | ५७२ | २७० |
| लातुर | १४८ | ५०० | १२० | ६०० |
| नांदेड | २६५ | ३५० | २९५ | ३५० |

राज्यात मूग व उडीदाची खरेदी दिनांक १६/१०/२०१८ पासून सुरु केली असून दिनांक ०६/१२/२०१८ पर्यंत झालेली एकूण खरेदी पुढीलप्रमाणे आहे.

| पिक | एकूण खरेदी(क्विंटलमध्ये) | लाभार्थी शेतकरी | एकूण खरेदी किंमत(रुपये) |
|---|---|---|---|
| मूग | ८३५५३.८६ | १५६६७ | ५८.२८ कोटी |
| उडीद | ४३६०३.२७ | ७३७८ | २४.४२ कोटी |

-----*****-----

एच-११७७-१३अ.

## लक्षवेधी सूचना क्र.

**सर्वश्री.राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो.आरीफ नसीम खान ,अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यंबकराव भिसे, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, श्री. अब्दूल सत्तार, अँड. यशोमती ठाकुर सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, राणाजगजीतसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. संदिप नाईक, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, राहूल जगताप, दत्तात्रय भरणे, मकरंद जाधव-पाटील, भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, डॉ. मधुसूदन केंद्रे, सर्वश्री. बबनराव शिंदे, दिलीप सोपल, शिवेंद्रसिंहराजे भोसले, मनोहर नाईक, संग्राम जगताप, सर्वश्रीमती सुमन पाटील, ज्योती कलानी, सर्वश्री अवधूत तटकरे, प्रदीप जाधव-नाईक, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री. बच्चू कडू, विनायकराव जाधव-पाटील, शिरीष चौधरी, मोहन फड, डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना खालीलप्रमाणे आहे.**

"राज्यातील शासकीय विभागामधील रिक्त पदावर भरतीकरीता शिफारस करण्यासाठी आयटी विभागाने ऑनलाईन परिक्षा घेण्यासाठी सुरू करण्यात आलेले महापरिक्षा पोर्टल,सदर महापरिक्षा पोर्टलद्वारे होणाऱ्या परिक्षा सलग दोन अथवा तीन दिवस शिफ्टमध्ये घेण्यात येत असल्याने, पहिल्या शिफ्टच्या प्रश्न पत्रिकेतील प्रश्न, त्यांची मांडणी, प्रश्न विचारण्याची पध्दत, अभ्यासक्रमातील ठरावीक भागावर विचारण्यात आलेले प्रश्न, हे पेपर झाल्यानंतर काही तासातच सोशल मिडीयावर व्हायरल होणे, पोर्टलचे कंत्राट मध्यप्रदेशातील व्यावसायिक प्रशिक्षण मंडळाच्या (व्यापमं) परिक्षा घेणाऱ्या यूएसटी ग्लोबल या आयटी कंपनीला देणात येणे, सरकारी नोकर भरती, सदोष पोर्टलच्या आधारे, मध्यप्रदेशप्रमाणे महाराष्ट्रात आगामी ७२ हजार पदांच्या भरतीत घोटाळा होण्याच्या भितीने, कर्मचाऱ्यांची भरती, महापरिक्षा पोर्टलव्दारे भरतीप्रक्रिया राबवू नये, याकरिता भारतीय विदयार्थी मोर्चोच्या आंदोलकांनी दिनांक.२१ सप्टेंबर, २०१८ च्या सुमारास नाशिक येथे केलेले आंदोलन, तसेच दिनांक. ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी स्पर्धा परिक्षा विदयार्थी कृती समितीने जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या कार्यालयावर काढलेला मोर्चा,याप्रकरणी महाव्यापम घोटाळा होण्याची निर्माण झालेली परिस्थिती, याकरीता महापरिक्षा पोर्टलव्दारे घेण्यात येणाऱ्या परिक्षातील गैरप्रकाराबाबत परिक्षार्थींच्या असलेल्या तक्रारी ,महापरिक्षा पोर्टलव्दारे शासकीय पदभरतीकरिता परिक्षा घेण्याच्या शासनाने घेतलेला निर्णय, याप्रकरणी मा. विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक.२९ ऑगस्ट, २०१८ रोजी पत्र पाठवून निर्णय रद्द करण्याची केलेली मागणी, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्यात शासनाचे सर्व प्रशासकीय विभाग व अधिनस्त कार्यालयाच्या भरती व सेवा प्रवेश परीक्षा सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) शासन निर्णय क्रमांक.मातंस-०८८/२७/२०१६ ,दि.१९ संप्टेबर, २०१७ अन्वये ऑनलाईन पध्दतीने महापरीक्षा पोर्टलव्दारे घेण्यात येतात.सदर परीक्षांचे आयोजन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) यांचेकडून करण्यात येते. महापरीक्षा पोर्टल विकसीत करण्याकरीता Detail Project Report ( DPR) व Request for Proposal (RFP) तयार करण्यासाठी दिनांक ९ मे २०१६ रोजी सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत के.पी.एम.जी.या संस्थेची निवड करण्यात आली. दिनांक २७/०१/२०१७ रोजी उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत Detail Project Report ( DPR) ला मान्यता दिली गेली आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) हा प्रकल्प विकसीत व देखभाल करेल असा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार दिनांक २ मे २०१७ रोजी महा-टेंडर या वेबसाईटवर सदर प्रकल्पाचे टेंडर प्रसिद्ध करण्यात आले होते. याला ३ निविदाधारकांचा प्रतिसाद मिळाला. सदर निविदांचे मुल्यमापन करण्याकरीता विभागांतर्गत दिनांक ६ जून २०१७ रोजी निविदा मुल्यमापन समिती गठीत केली गेली.

ROTA H.H. 1285 (750-1-2018)-1) (पृ.मा.प.

सदर प्रकल्प विकसीत करण्यासाठी तांत्रीक आणि आर्थीक मुल्यमापनानंतर यु.एस.टी. ग्लोबल या संस्थेची समितीमार्फत निवड केली गेली व दिनांक १७ जुलै २०१७ रोजी सदर संस्थेला कार्यादेश देण्यात आला होता.

सदर परीक्षांमध्ये उमेदवारांनी दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार आणि वेगवेगळ्या शहर/जिल्ह्यांमध्ये उपलब्ध असलेल्या परीक्षा केंद्रांच्या क्षमतेनुसार महापरीक्षा पोर्टलमार्फत परीक्षा घेण्यात येतात. महापरिक्षा पोर्टलव्दारे घेण्यात आलेल्या परीक्षेबाबत काही तक्रारी मिळाल्या आहेत. अशा सर्व केंद्रांच्या सीसीटीव्ही फुटेजचे संपूर्णपणे विश्लेषण करण्यात आले आहे.

महापरीक्षा पोर्टलसंदर्भात विविध माध्यमांद्वारे एकुण ४७५ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.त्यामध्ये ऑनलाइन माहिती अधिकार अर्जांद्वारे एकुण ७२ , ऑफलाईन माहिती अधिकार अर्जांद्वारे ११८ तक्रारी, आपले सरकार पोर्टलव्दारे १२८ तक्रारी,महापरीक्षा पोर्टलवरील ऑनलाईन १३० तक्रारी, लोकप्रतिनिधीं व वृत्तपत्रांमधील बातम्यांद्वारे प्राप्त २७ तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत. यासंदर्भात एकुण ४७५ तक्रारींपैकी ३२३ तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

महापरिक्षा पोर्टलद्वारे घेण्यात येणाऱ्या विविध विभागांच्या परीक्षांमध्ये १०,५८,५४२ एवढ्या उमेदवारांची / परीक्षार्थींची नोंदणी करण्यात आली आहे.त्यापैकी ८,३५,४९५ एवढ्या उमेदवारांनी परीक्षा दिली आहे. महापरीक्षा पोर्टल व त्याद्वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षांसंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने प्रधान सचिव,माहिती तंत्रज्ञान यांचे स्तरावर आतापर्यंत संबंधीत अधिकाऱ्यांसोबत सुमारे ५० ते ६० इतक्या बैठका घेण्यात येऊन परीक्षा पध्दतीत आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत वेळोवेळी निदेश देण्यात येत असतात. महापरीक्षा पोर्टलव्द्वारे आतापर्यंत एकुण १९ विभागांच्या एकुण ६४ संवर्गासाठी १९ परीक्षा घेण्यात आलेल्या आहेत. आतापर्यंत विविध विभागांची एकुण ४९८१ पदे भरण्यात आलेली आहेत. त्यापैकी १७१ उमेदवारांची प्रत्यक्षात भरती करण्यात आलेली आहे.

महापरीक्षा पोर्टल रद्द करणेबाबत भारतीय विदयार्थी मोर्चा यांच्या वतीने दिनांक २१/०९/२०१८ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना जिल्हाधिकारी, नाशिक यांचेमार्फत निवेदन देण्यात आलेले आहे. तसेच यासंदर्भात शिक्षण वाचवा नागरी कृती समिती व कोल्हापूर जिल्हयामधील स्पर्धा परिक्षा विदयार्थी यांचे वतीने दिनांक ५ऑक्टोबर, २०१८ रोजी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापूर यांचेकडे देण्यात आलेले आहे. महापरिक्षा पोर्टलव्दारे घेण्यात येणाऱ्या परीक्षांबाबत परिक्षार्थींच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच महापरिक्षा पोर्टलव्दारे शासकीय पदभरतीकरीता परीक्षा घेण्याचा शासनाने घेतलेला निर्णय रद्द करण्याच्या मागणीबाबतचे मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे पत्र प्राप्त झाले आहे.

सदर पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषगांने महापरीक्षा पद्धतीचे विश्लेषण करून सूचनांवर केलेल्या कारवाईचा तपशिलवार अहवाल तयार करण्यात येत आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यामधील निष्कर्षाच्या आधारे पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच महा-ई परीक्षा पोर्टलचे तांत्रिक परिक्षण (ऑडीट) हे त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येत आहे. सदर तांत्रिक परिक्षणाअंती त्यांनी दिलेल्या अहवालाच्या आधारे महा-ई परीक्षा पध्दतीत आवश्यक ते बदल करण्यात येतील.

-------------------------------

H 12-85-!म

**महाराष्ट्र विधान सभा**

**सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन**

**श्रीमती मेधा कुलकर्णी, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना :-**

"स्मार्ट पुणे शहराचा झपाटयाने होत असलेला विकास, वाढणारे नागरीकरण व त्यामुळे वाढणारी खाजगी वाहतूक व दळवणवळण संबंधित समस्या, अनेक वर्दळीच्या ठिकाणी सिग्नल नसणे किंवा बंद अवस्थेत असणे, अल्पवयीन मुलांना विनापरवाना वाहन चालवण्यास देणे, त्यामुळे वाढलेले अपघात, तसे चालकांचे बेफिकीरपणे वाहन चालविण्याचे वाढलेले प्रकार, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे, मद्यप्राशन करुन वाहन चालविणे, विना व चुकीच्या नंबर प्लेटची वाहने रस्त्यावरुन चालविली जात असणे, वाहन चालवितांना मोबाईलवर बोलणे, कानाला हेडफोन लावून वाहन चालविणे, वाहनांमधून क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची केली जाणारी वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात माल वाहून नेणारी वाहने, रस्ते मोठे व सुसज्ज असूनही पी १ व पी २ फलक नसल्याने बेफिकीरीपणे रस्त्याच्या दुतर्फा वाहने थांबवली जाणे, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असणे, रस्त्यावरुन लग्न अथवा इतर कार्यक्रमाच्या मिरवणुकीमुळे रस्त्याचे क्षेत्र कमी होणे, त्यामुळे वाढणारे अपघाताचे व वाहतुक खोळंब्याचे प्रमाण, रात्रीच्या वेळी शहरातील रस्त्यावर हॉटेलच्या बाहेर व इतर कारणात्सव मोठ मोठी वाहने पार्क होत असणे, कित्येक महिने एकाच ठिकाणी थांबलेल्या वाहनांवर कुठलीच कारवाई होत नसणे, वाहतूक पोलिसांचा अपुरा कर्मचारी वर्ग यामुळे पुणे शहरात अपघातांमध्ये नागरीकांचा नाहक बळी जाणे, वाहतूक व्यवस्था सर्वसामान्य नागरिकांना जीवघेणी ठरत असणे, वाहतूक पोलिसांसाठी सक्षम यंत्रणा नसणे, वाहतूक पोलिसांचा वाहतूक नियंत्रण व नियोजन करण्यांत येत असलेले अक्षम्य अपयश, त्यामुळे निरपराध लोकांचे जात असलेले प्राण, भविष्यातील वाहतूक नियोजन आणि नियंत्रणाचा प्रश्न सोडविण्याकरीता स्वतंत्र वाहतूक नियंत्रण प्राधिकरण स्थापनेची आवश्यक असणे, याबाबत तातडीने शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन**

सन २०११ च्या जनगणेनुसार पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकसंख्या सुमारे ३१.१५ लाख इतकी असून सन २०१७ अखेर सुमारे ३५.५० लाख इतक्या वाहनांची नोंदणी झालेली आहे. यामध्ये दररोज साधारणत: ५०० ते ७०० नविन वाहनांची भर पडत आहे. वाढत्या वाहन खरेदीमुळे पार्किंगच्या जागेचा तुटवडा जाणवत असल्यामुळे बहुतांशी वाहनांचे पार्किंग सार्वजनिक रस्त्यांवर होत असल्यामुळे सार्वजनिक रहदारीस रस्ता कमी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच पुणे शहरामध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत विविध रस्त्यांवर रस्ते - चौक सुधारण्याची कामे चालू आहेत. तसेच मेट्रो मार्गीकरीता रस्ते खोदाईची कामे रस्त्याच्या मध्यभागी चालू असल्याने रस्त्यांच्या दोन्ही वाहजूची वाहतूकीची एक लेन कमी झालेली आहे. त्यामुळे शहरात विविध ठिकाणी वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे.

पुणे शहरामध्ये महत्वाच्या व जास्त प्रमाणात वाहतूक असणाऱ्या २५४ चौकांमध्ये वाहतूक सिग्नल बसविण्यांत आले असून वाहतुकीच्या परिस्थितीनुसार आवश्यक त्याप्रमाणे वाहतूक सिग्नल बसविण्याबाबत पुणे महानगरपालिका, कँटोनमेंट बोर्ड यांना वाहतूक शाखेकडून अवगत केल्या जाते. त्याचप्रमाणे वाहतूक सिग्नल बसविणे, त्यांची दुरुस्ती करणे इ. कार्यवाही करण्यांत येते. याकरीता दोन स्वतंत्र सुसज्ज वाहनांची व्यवस्था करण्यांत आली असून सर्व विद्युत विषयक उपकरणे, कुशल अकुशल कर्मचारी आणि पोलीस अधिकारी यांच्या मदतीने केली जातात.

पुणे शहर वाहतूक शाखेकडून वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर परिणामकारक कारवाई केली जात आहे. माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१८ पर्यंत अल्पवयीन मुलांनी वाहन चालविल्याबाबत ६१८ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यांत आली असून अल्पवयीन पाल्यांना वाहन चालविण्यास न देणेबाबत त्यांच्या पालकांचे प्रबोधन करण्यांत आले आहे. वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर वेळोवेळी विशेष मोहिम राबवून कारवाई केली जाते. माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत अशा १५,२०,५९४ वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यांत आलेली आहे.

पुणे शहरामध्ये सार्वजनिक रस्त्यांवर मद्यप्राशन करुन वाहन चालविल्याप्रकरणी माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत १,३६८ वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात खटले दाखल करण्यांत आले आहेत. तसेच याच कालावधीत विनानंबरप्लेटचे वाहन चालविल्याबाबत ६०९ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यांत आली आहे. उपरोक्त कालावधीत ४६,५६० वाहनचालकांवर, वाहन चालवितांना मोबाईल फोनचा वापर केल्याबाबत दंडात्मक कारवाई करण्यांत आली असून त्यांचे वाहन अनुज्ञप्ती निलंबनाबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यांत आलेले आहेत.

माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या १,३९९ वाहनांवर कारवाई करण्यांत आली असून मालवाहू वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक केलेल्या २७० वाहनांवर कारवाई करण्यांत आली आहे. शहरामध्ये २८० ठिकाणी पी १, पी २ वाहनपार्किंग सुविधा उपलब्ध असून नव्याने २१ ठिकाणी सदर सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्तावित आहे.

शहरातील मंगल कार्यालये, मॉल, हॉस्पिटल, शाळा महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, सिनेमागृहे इ. ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता त्यांच्या प्रतिनिधींच्या बैठका आयोजीत करुन त्यांच्या आस्थापनांच्या ठिकाणी वाहतूक नियमनाकरीता वॉर्डन नेमणेबाबत व सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता सूचना देऊन नोटीसा अदा करण्यांत आल्या आहेत. शहरातील सार्वजनिक रस्त्यांवर दिर्घकाळ पार्क केलेली वाहने काढून टाकण्याबाबत पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने कारवाई करण्यांत येत आहे.

पुणे शहर वाहतूक शाखेकडे सद्य:स्थितीत ७५ अधिकारी आणि १०९८ कर्मचारी असून उपलब्ध मनुष्यबळामध्ये वाहतूक नियमन, नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई, सण, उत्सव, मोर्चे, व्ही.आय.पी.बंदोबस्त इ. प्रकारची कर्तव्ये केली जात आहेत.

वाहतुक पोलीस विभागाचे अधिकारी, पुणे महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी, क्षेत्रीय कार्यालयांचे अधिकारी, अतिक्रमण विभागाचे अधिकारी याची वेळोवेळी समन्वय बैठक आयोजीत करण्यांत येते. वाहतूक शाखेचे अधिकारी आणि महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांचा व्हॉटसअप ग्रुप तयार करण्यांत आला असून दैनंदिन समस्या एकमेकांना शेअर करुन तात्काळ निवारण करण्यांत येते. अशाप्रकारे शहरातील सुमारे ९४९ अतिक्रमणे काढण्यांत आली असून बहुतांशी फुटपाथ मोकळे करण्यांत आले आहेत. तसेच महानगरपालिकेमार्फत क्रेन, टेम्पो इ. उपलब्ध करुन देण्यांत आले आहेत. वाहतूक पोलीसांनी सूचविल्याप्रमाणे व आवश्यक नियोजनानुसार महानगरपालिकेमार्फत सिग्नल पोल व दिवे लावले जातात आणि त्यांची दुरुस्ती व देखभाल करण्यांत येते. त्याकरीता २ स्वतंत्र सुसज्ज वाहनांची व्यवस्था व विद्युतविषयक उपकरणे वापरणारे कुशल व अकुशल कर्मचारी उपलब्ध करुन देण्यांत येतात.

पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत व सक्षम ठेवण्याकरीता उपरोक्तप्रमाणे विविध उपाययोजना करण्यांत येत असून वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जात आहे. तसेच वाहनचालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत वेळोवेळी प्रबोधन केले जात आहे.

* * * * * * * * * *

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.शंभूराज देसाई, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-

"पाटण विधानसभा मतदारसंघ हा डोंगरी व दुर्गम भागात वसलेला मतदार संघ असणे. या मतदार संघाचा लोकप्रतिनिधी या नात्याने स्थानिक विकास निधीअंतर्गत तामकणे या डोंगरी गांवामध्ये पिण्याच्या पाण्याची योजना मंजूर असणे, तसेच राज्याचे मुख्यमंत्री महोदय ज्या कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिती न्यासाचे अध्यक्ष व मी कोषाध्यक्ष आहे त्या समितीच्या माध्यमातून डिगेवाडी - अडूळ या ठिकाणीही सुमारे २५ लक्ष रुपयांची पिण्याच्या पाण्याची योजना मंजुर असणे, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पाटण मतदारसंघात ग्रामीण भागातील नव्याने शाळा खोल्या बांधणे व नादुरुस्त शाळा खोल्यांची दुरुस्ती करणे ही कामे प्रस्तावित करणे, दरम्यान सातारा जिल्हा परिषदेचा या तिन्ही विकासकामांच्या निधीसंदर्भात कोणताही संबंध नसतांना केवळ जिल्हा परिषद, साताराचे ग्रामीण पाणी पुरवठा व शिक्षण विभागांची यंत्रणा कार्यान्वीत असताना जिल्हा परिषदेतील राजकीय हस्तक्षेपामुळे; जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये नको ते ठराव घेवून संबंधित यंत्रणांच्या मार्फत चुकीचे पत्रव्यवहार करुन पिण्याच्या पाण्याच्या योजनांच्या कामामध्ये जाणिवपूर्वक आडकाठी करण्याचे प्रकार पाटण विधानसभा मतदारसंघात घडणे, तर जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रस्तावित केलेल्या ग्रामीण भागातील नव्याने शाळा खोल्या बांधणे व नादुरुस्त शाळा खोल्यांची दुरुस्ती करणे ही कामे न घेता मनमानी कारभारामुळे येथील शिक्षण सभापतीच्या दबावाखाली येवून पाटण तालुक्यातील सात जिल्हापरिषदेत मतदारसंघात या कामांमध्ये समानता न बाळगता २४ कामांपैकी एकाच जिल्हा परिषद मतदासंघात १० शाळा खोल्यांची दुरुस्तीचे कामे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ज्या मतदारसंघातील शिक्षण सभापती आहेत त्याच मतदासंघात मंजुरीस देणे असा प्रकार घडला असणे, राजकिय दृष्टीकोनातून जिल्हा परिषदेचा या कामांच्या निधीसंदर्भात कोणताही संबध नसताना जाणिवपुर्वक होणारी अडवणूक यामुळे विविध विकासकामांवर परिणाम होत असून मतदारसंघातील जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष व नाराजी पसरलेली असून या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करुन विकास कामामध्ये जाणिवपुर्वक अडवणूक व राजकीय अडवणूक व राजकीय हस्तक्षेप करणा-यांच्या कृतीची उच्चस्तरीय चौकशी करुन यावर कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता. परंतु शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे डोंगरी मतदारसंघातील जनतेमध्ये राज्य शासनाविषयी पसरलेली तीव्र नाराजी व असंतोष लक्षात घेता याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

### मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन:-

तामकणे ता. पाटण येथे स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत रु. ४.९९ लक्ष किमतीच्या पाणी पुरवठा योजनेस जिल्हा नियोजन समितीने दि. ४.१२.२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तामकणे गावानजीकच्या डोंगरातील अस्तीत्वातील झऱ्यातून पाणी पुरवठा करण्याचे प्रस्तावित होते. तथापि डोंगरावरील नाथाची पाग या वस्तीतील ग्रामस्थांनी सदर झऱ्यातील पाणी तामकणे येथे देण्यास तिव्र विरोध केला आहे. नाथाची पाग येथील ग्रामस्थांना पुनर्वसन खात्याकडून गायमुख झरा उदभवावरुन पाणी पुरवठा करण्यात आला आहे. गायमुख झरा ज्या जागेत आहे. (गट क्र. १३९/१/१अ-१ब) ती जागा नाथाची पाग येथील ग्रामस्थांनी सन १९५९ मध्ये खरेदी केली असून तशी नोंद ७/१२ उता-यावर आहे. तथापी तामकणे येथील ग्रामस्थ श्री. गोविंद विठ्ठल पवार यांनी सदर जागेवर मालकी हक्क असल्याचा दावा केला आहे. नाथाची पाग येथील ग्रामस्थांनी सदर जागा खाजगी मालकीची असल्याचा कोर्टात

दावा दाखल केला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या दि. २०.१०.२०१८ रोजीच्या बैठकीत मा. पालकमंत्री यांनी कोर्टाची स्थगिती नसल्याने काम सुरु करण्याचे आदेश दिले तथापि त्यास नाथाची पाग येथील ग्रास्थांनी त्यास विरोध करुन ठिय्या आंदोलन केले. या ठिकाणी यापुर्वी नाथाची पाग व तामकणे येथील लोकांमध्ये वाद होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता ही बाब विचारात घेवून याबाबत दक्षता घेवून जागेची मालकी व इतर कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

काळेवाडी डिंगेवाडी ता. पाटण पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे जिल्हाधिकारी, सातारा यांना सादर करण्यात आले होते. ग्रामसभेच्या ठरावानुसार गट क्र. ८४० मध्ये योजनेचा उदभव विहीर प्रस्तावित करण्यात आली आहे. विहिरीच्या जागेचे भुजल सर्वेक्षण करुन दिलेल्या प्रमाणपत्रानुसार तयार केलेल्या रु. २६,१८,३७८/- इतक्या किमतीच्या प्रस्तावास सचिव, कोयणा भूकंप पुर्नवसन निधी समितीने दि. २०.११.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. योजनेच्या निविदा मागविण्यात येवून दि. ६.०३.२०१८ रोजी ठेकेदारास कार्यादेश देण्यात आले. माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये ग्रामपंचायत निवडणूक होऊन डिसेंबर, २०१७ मध्ये नवीन समित्या अस्तित्वात आल्या. योजनेच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करताना ग्रामपंचायतीचे उपसरपंच व ५५ ग्रामस्थांनी योजनेच्या उदभवाचे ठिकाण गट क्र. ८४० ऐवजी गट क्र. ८९८ मध्ये निश्चित करण्याची विनंती मा. विधानसभा सदस्य व मा. पालकमंत्री महोदयांना दि. २२.६.२०१८ च्या पत्रान्वये केली. ग्रामस्थांचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर नवीन जागेसाठी मालकाचे संम्मतीपत्र/बक्षीसपत्र, ग्रामपंचायत ठराव इत्यादि कागदपत्र उपलब्ध करुन न दिल्याने व योजनेच्या कामास विलंब होत असल्याने मंजूर योजने प्रमाणे निश्चित केलेल्या जागेवर उदभवाचे काम सुरु करण्याचा मुद्या दि. २८.९.२०१८ रोजी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित झाला होता. सदर मुद्या विषयपत्रिकेमध्ये समाविष्ट नव्हाता. सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुर्वी मंजूर झालेल्या आराखडयानुसार काम सुरु करण्याची मागणी सदस्यांकडून करण्यात आली. मा. लोकप्रतिनिधींच्या दि. २६.६.२०१८ च्या निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागाने दि. १९.११.२०१८ च्या पत्रानुसार सादर केलेल्या अहवालानुसार गट क्र. ८४० ऐवजी गट क्र. ८९८ मध्ये उदभव विहिरीचे काम केल्यास खर्चात बचत अपेक्षित आहे. त्यानुसार नवीन जागेचे सम्मतीपत्र प्राप्त झाले असून ग्रामपंचायतीचा ठराव व जागेचा ताबा घेण्याची कार्यवाही सुरु आहे. आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध झाल्यानंतर ग्रामसभेच्या ठरावानुसार नव्याने उपलब्ध होणाऱ्या जागेची सविस्तर पडताळणी करुन योजनेचे काम सुरु करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडून नवीन शाळा खोल्या व शाळा दुरुस्तीसाठी सन २०१८-१९ मध्ये नवीन वर्ग खोलीसाठी ४००.०० लक्ष व शाळा दुरुस्तीसाठी २८०.०० लक्ष मंजूर नियतव्यय आहे. या आधारे आराखडयातील प्रस्तावित कामापैकी उपलब्ध नियतव्ययाच्या दिडपटीने ९१ नवीन वर्ग खोल्या व १५६ शाळा दुरुस्तीच्या कामांना शिक्षण समितीने दि. २८.०६.२०१८ रोजी झालेल्या सभेमध्ये मंजूरी दिली आहे. या कामांना दि. २३ जुलै, २०१८ व ३० जुलै, २०१८ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सातारा जिल्हयामध्ये एकूण ६४ जिल्हा परिषद गट असून पाटण तालुक्यात ७ गट आहेत. पाटण विकास गटामध्ये एकूण ५३२ शाळा असून ३२ नवीन वर्ग खोल्या व ६४ दुरुस्तीच्या प्रस्तावाचा समावेश सन २०१८-१९ च्या आराखडयात करण्यात आला आहे. त्यापैकी २१ नवीन वर्ग खोली व २४ दुरुस्तीचे कामास मंजूरी देण्यात आली आहे.

------

लक्षवेधी सूचना गृह विभाग

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**सर्वश्री. भारत भालके, राधाकृष्ण विखे-पाटील, डी.पी. सावंत, अस्लम शेख, जयकुमार गोरे, अमीन पटेल, श्रीमती निर्मला गावित, प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना :-**

"ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथील डॉक्टर अनुराधा बिराजदार या मुलीने अंतरजातीय विवाह केल्यामुळे तिच्या आई-वडिलांनीच त्या मुलीची विषारी द्रव्य पाजून हत्या करुन मृतदेह जाळून टाकल्याची घटना दिनांक ०४.१०.२०१८ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली असून, उपरोक्त खुन प्रकरणात मयत मुलीच्या आई-वडिलांनीच निर्घुणपणे हत्या करुन प्रेताची विल्हेवाट लावण्याप्रकरणी संबधित पोलिस प्रशासनाने त्यांचेवर गुन्हा दाखल करुन त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असल्याचे आढळून येणे, तसेच या हत्येमध्ये मयत मुलीच्या आई-वडिलांसह इतरही व्यक्तीचा यामध्ये सहभाग असल्याने पोलिस प्रशासनाने अद्याप त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली नसल्याने उपरोक्त खुन प्रकरणी इतरही दोषी असणाऱ्या व्यक्तींना शासनाने तात्काळ अटक करुन त्यांना शिक्षा होणेसाठी नागरिकांची मागणी असणे, परिणामी पोलीस यांच्या विरोधात जनसामान्यात पसरलेला असंतोष, यावर पोलीस प्रशासन करीत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई उपाययोजना व प्रतिक्रीया.

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

सदर प्रकरणी ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथील डॉक्टर अनुराधा बिराजदार या मुलीने आई-वडिलांच्या संमतीविना आंतरजातीय विवाह केल्यामुळे तिच्या आई-वडिलांनी त्या मुलीची हत्या करुन मृतदेह जाळून अंत्यविधी केला, अशा प्राप्त फिर्यादीवरून मंगळवेढा पोलीस स्टेशन जि. सोलापूर येथे गु.र.नं.४०८/२०१८ भा.दं.वि.कलम ३०२,२०१,३४ प्रमाणे दि.०५/१०/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात २ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांच्या व्यतिरिक्त अन्य आरोपी अद्याप निष्पन्न झालेले नाहीत. सदर २ आरोपींना अटक करण्यात आली असून, सदर आरोपींना मा. न्यायालयाने पोलीस कोठडी दिली आहे. याप्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल रासायनिक तपासणीकरीता पाठविण्यात आला आहे. तसेच फिर्यादी व साक्षीदारांचे सीआरपीसी १६४ प्रमाणे मा.न्यायालयात जबाब नोंदविले आहेत. गुन्ह्याचा तपास सूरु आहे.

---

रोटा/एच १२८२ [७५०-१५१९].

लक्षवेधी सूचना क्रमांक :-

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे तृतिय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री. रणधीर सावरकर, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५अनुसार दिलेली लक्षेवधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"शेती व नागरी क्षेत्रातील वन्य प्राण्यांचा वाढता हैदोस, वन्य प्राण्यामुळे जंगलाशेजारी असणाऱ्या शेती मध्ये पिकाचे होणारे प्रचंड नुकसान, दरवर्षी कोट्यावधी रुपयांचे पिक नुकसानीसोबत मानवी जीविताची होत असलेली हानी, वन्य जीव संवर्धन व संरक्षण कायद्यामुळे वन्य प्राण्याचा बंदोबस्त करण्यात शेतकरी व नागरिकांना उद्भवणाऱ्या प्रचंड अडचणी, यवतमाळ जिल्ह्यात अवनी वाघिणीच्या हल्ल्यामुळे १४ शेतकरी व आदिवासींचे गेलेले बळी, रानडुक्कर, हरीण, रोही, नीलगाय, वानर, इत्यादींच्या वाढत्या हौदोसा मुले शेतीचे प्रचंड नुकसान, बिबटे, वाघ अस्वल, यांच्या हल्ल्यामुळे होत असलेली जीवित हानी इत्यादी होणाऱ्या आर्थिक नुकसानीच्या सर्वेक्षण व मूल्यांकनासाठी तसेच नुकसान भरपाई निश्चित करुन अदा करण्यासाठी एक स्वतंत्र आयोग नेमण्यासाठी निर्माण झालेली स्थिती, वन्यजीव यांच्याकडून होणारे नुकसान टाळण्यासाठी सामुहिक कुंपणाची योजना इत्यादी बाबींवर आवश्यक उपाय योजना करिता केंद्र शासनाने यासाठी आवश्यक कायदे निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे पाठविलेला प्रस्ताव तसेच सदर उपाय योजनांसाठी राज्यशासनाची भूमिका व करावयाची कारवाई"

---

**श्री.सुधीर मुनगंटीवार** मंत्री (वने)

### निवेदन

राज्यात सन २०१३-१४ पासून ते नोव्हेंबर, २०१८ पर्यंत वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मनुष्य मृत्यूच्या २६१, मनुष्य अपंगत्वाच्या २६, मनुष्य गंभीर जखमीच्या ९६३ व मनुष्य किरकोळ जखमीच्या १९३४ घटना तसेच राज्यात सन २०१३-१४ पासून ते ऑक्टोंबर २०१८ पर्यंत वन्यप्राण्यापासुन पिक नुकसानीची १४६३५८ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११(१)(a) मधील तरतुदीनुसार मानवी जिवितास धोकादायक ठरलेल्या अनुसुचि-I मधील वन्यप्राण्यांची शिकार करण्याची तरतुद आहे. तसेच कलम ११(१)(b) मधील तरतुदीनुसार मानवी जिवितास तसेच मालमत्ताला (शेतपिक धरून) नुकसान करणा-या अनुसुचि-II ते IV मधील वन्यप्राण्यांची पारध करण्याची तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार वन क्षेत्राला लागुन असलेल्या शेतातील शेतपिकाचे नुकसान करणारे वन्यप्राणी निलगाय व रानडुक्कर यांना पारध करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २२ जुलै २०१५ अन्वये अटी सुलभीकरण करण्यात आलेली आहे. पारध करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करण्याकरिता परवाने जारी करण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिका-यांना प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे वन्यजीव संवर्धन व संरक्षण कायद्यामुळे वन्यप्राण्याचा बंदोबस्त करण्यात शेतकरी व नागरिकांना कोणतीही अडचण नाही.

पांढरकवडा वनविभागातील पांढरकवडा व राळेगांव या तालुक्यांमध्ये दिनांक १ जुन, २०१६ ते २८ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वाघाच्या हल्ल्यात एकूण १३ व्यक्तींचा मृत्यु झाला आहे. तसेच बऱ्याच पाळीव जनावरांचा मृत्यु झाला आहे. वाघाच्या हल्ल्यात मृत्यु झालेल्या १३ व्यक्तींच्या कायदेशीर वारसास व पशुधनाच्या मालकास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

शेतपिकाचे नुकसान झाल्यास त्याची शहानिशा करणे, पंचनामा करणे, नुकसान क्षेत्राची मोजणी करणे, पुरावे तपासणे व नुकसानीचे मुल्य ठरविणे इत्यादि कार्यवाही करण्यास समितीस होणारा विलंब टाळण्यासाठी व पंचनाम्यात सुलभता येण्यासाठी तसेच प्रत्यक्षात बाधीत शेतक-यांना देय अर्थसहाय्य तत्परतेने देणे शक्य व्हावे

म्हणुन समितीमध्ये स्थानिकांचा सहभाग व सुसूत्रीकरण करणे व ३० दिवसांचे आंत बाधीत व्यक्तीस आर्थिक सहाय्याची रककम अदा करण्यासाठी अवलंबिण्यात येणारी पध्दतीमध्ये सुधारणा शासन निर्णय दिनांक २८.०९.२०१५ अन्वये करण्यात आली आहे.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना अंतर्गत वन्यप्राण्यांमुळे पिकांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता शासन निर्णय दिनांक २१.०३.२०१८ अन्वये सदर योजनेची व्याप्ती वाढवून त्या अंतर्गत व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात तसेच अभयारण्ये/राष्ट्रीय उद्याने यांच्या सिमेपासून ५ कि.मी. संवेदनशील असलेल्या गावांमध्ये वन्यप्राण्याकडून शेतपिकांचे नुकसान टाळण्यासाठी प्रायोगिक तत्वावर जाळीचे कुंपण (चेन लिंक फेन्सिंग) अंशदानात्मक पध्दतीप्रमाणे सामुहिक लाभार्थ्यांस ९० % शासकीय अनुदान कमाल १००० र. मी. पर्यंत देण्याच्या योजनेस शासनाने मान्यता दिलेली आहे.

- मानव वन्यजीव संघर्षाला आळा घालण्याकरीता प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

१. महत्वाच्या ठिकाणी २९ तपासणी नाके उभारण्यांत आलेले आहे, त्या मध्ये कोर क्षेत्रात २२, बफर क्षेत्रात ०३ व आलापल्ली क्षेत्रात ०४ असून त्यांवर रात्र-दिवस वनकर्मचारी कार्यरत असतात.

२. वनविभागात बिनतारी संदेश यंत्रणा २४ तासाकरीता कार्यरत असून गस्तपथक सातत्याने कार्यरत आहे.

३. वाघ, बिबट व इतर वन्यप्राणी यांना नागरी वस्तीत येण्यापासून रोखण्यासाठी कर्मचा-यांचे वेगवेगळे गट तयार करण्यात येवून संरक्षण समितीच्या मदतीने नियमित गस्त करून वन्यप्राण्यांना वनाकडे हुसकावण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

४. वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मनुष्य हानी/जखमी, पशु हानी/जखमी व शेतपीक नुकसान भरपाईची रक्कम वेळेवर अदा करण्यात येत आहे.

५. ज्या भागात वाघाचे/ बिबटयाचे अस्तित्व आहे त्या ठिकाणी सावधानतेचे इशारादर्शक पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत.

६. कॅमेरा ट्रॅप लावून वाघ/बिबट यांच्या हालचालींची संनियंत्रण करण्यात येते.

७ वनालगत असलेल्या स्थानिक लोकांच्या मुलभूत गरजांचे निराकरण करण्याकरीता स्थानिक स्थरावर अस्थाई डेपो उभारून त्या ठिकाणी निस्तार दराव्दारे बांबू, जलतन व ईत्यादीचा पुरवठा मागणी नुसार करण्यांत येतात.

८. वन्यप्राणी उन्हाळयामध्ये पिण्याच्या पाण्याच्या शोधात नागरी वस्त्याकडे फिरकू नये व त्याअन्वये अवैध शिकारीस वाव मिळू नये यासाठी त्यांना वनातच पिण्यांचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव/ खोदतळे बांधणे, कृत्रिम पाणवठे (सिमेट टाके बांधणे) इत्यादी कामे करण्यांत आले आहेत. तसेच उपलब्ध बारमाही व हंगामी पाणस्थळावर नियमितपणे गस्त वाढवुन त्यामध्ये सुध्दा पाणी जास्त काळ उपलब्ध राहील याबाबत काळजी घेण्यात येत आहे.

९. महत्वाच्या ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आलेले असून त्यावर रात्र-दिवस वनकर्मचारी कार्यरत असतात.

१०. बफर क्षेत्रातील गावात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना राबवली जात आहे. त्याअंतर्गत एलपीजी गॅस पुरवठा, शौचालय बांधणे ह्या उपक्रमांचा समावेश करण्यात आल्याने मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्यास मदत होत आहे.

११. वाघ, बिबट व इतर वन्यप्राण्यांचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रात माहिती फलक तयार करून जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. तसेच वाहनाची गती नियंत्रीत ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहे.

-*******-

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**कु. प्रणिती शिंदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना.**

"ता.मंगळवेढा जि.सोलापूर माचनूर येथून २७ ऑक्टोबर, २०१८ रोजी अपहरण झालेल्या प्रतिक शिवशरण वय ९ या तिसरीत शिकणाऱ्या मुलाची निघृण हत्या होणे, या मुलाचे अपहरण झाले तेव्हा मुलाच्या पालकांनी पोलिसांकडे दाद मागणे, परंतू पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणे व २२ तासांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करणे, या विलंबामुळे तातडीने तपास न झाल्याने अपहरण झालेल्या मुलाची निघृण हत्या होणे, ही हत्या वैयक्तिक वादातून की नरबळी प्रकरणातून झाली या विषयीची चर्चा नागरिकांत सुरू झाली असणे, त्यामुळे सोलापूर शहर व राज्यभरातील अनेक मान्यवर नेते, सामाजिक संस्था, राजकीय संघटनांकडून आंदोलणे मोर्चे होणे, त्यानंतर या हत्येप्रकरणी तब्बल २१ दिवसांनी पोलिसांनी एका १७ वर्षीय मुलास ताब्यात घेणे, परंतू हत्या का झाली याबाबत उलघडा करण्याबाबत पोलिसांनी केलेले दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, त्यामुळे शासनाने या हत्येचा तपास सीआयडीकडून करण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

प्रतिक महादेव शिवशरण हा मौजे माचणुर ता. मंगळवेढा येथील मराठी शाळेचे समोर पटांगणात लहान मुलांचे सोबत खेळत असताना त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून पळवून नेलेबाबतच्या फिर्यादीवरुन मंगळवेढा पोलीस ठाणे गु.र.क्र. ४३०/२०१८ भा.दं.वि.स. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी तपासात गावातील सिध्देश्वर मंदीराचे जवळील महादेव श्रीमंत डोके यांचे उसाचे पिकात प्रतिक शिवशरण याचा मृतदेह मिळून आलेने, मयताचा मरणोत्तर पंचनामा करण्यात आला आहे. मयताच्या मानेवर डावे बाजुस मोठी जखम व तीन छिद्रे पडलेली दिसत असुन सदरचे प्रेत यातील फिर्यादी व त्याचे नातेवाईकांनी ओळखुन सदरचे प्रेत प्रतिक शिवशरण याचे असलेचे सांगितले आहे. प्रेताचे पोस्ट मार्टम मध्ये मृत्युचे कारण Cut throat injury Unnatural असे मत दिलेले आहे. या वरुन सदर गुन्हयास भा.दं.वि.स. कलम ३०२,३६४ वाढीव कलमे लावण्यात आलेली आहेत.

यात नानासाहेब पिराजी डोके रा. माचणूर ता. मंगळवेढा याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झालेने त्यास दिनांक १८/०१/२०१९ रोजी अटक करण्यात आलेली आहे. आरोपी नानासाहेब डोके याने गुप्तधन मिळावे व विवाहीत मुलीला मुलबाळ व्हावे या करीता त्याचे सांगणे वरुन आरोपी भारत शिवशरण याने नरबळी देण्यासाठी प्रतिक शिवशरण यास विधीसंघर्षग्रस्त बालक वैभव भारत शिवशरण याचे मदतीने फुस लावुन घटनास्थळी नेले असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. तसेच आरोपी नानासाहेब डोके यास अ.जा.अ. ज. अ. प्र. सुधारीत कायदा

२०१५ चे कलम ३ (२) (अं) लावण्यात आले आहे. याप्रकरणी एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी एक विधी संघर्षग्रस्त आहे.

गुन्हयाचे तपासा दरम्यान परीस्थितीजन्य पुरावे व प्राप्त वैदयकीय अभिप्राय तसेच गुन्हयात उपलब्ध पुराव्या वरुन गुन्हयाचा प्रकार हा नरबळी असलेचे निष्पन्न झालेने, सदर गुन्हयास महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालणे व त्याचे समूळ उच्चाटन करणे अधिनियम २०१३ चे कलम ३(२) वाढ करणेत आलेले आहे. सदरचा गुन्हा दाखल करणेस प्रभारी अधिकारी मंगळवेढा यांनी विलंब केलेने त्यांची प्राथमिक चौकशी करण्यात येत असून त्यांची मंगळवेढा पोलीस ठाणे येथून बदली करण्यात आलेली आहे.

--------

## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना

सर्वश्री. अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, राणाजगजीतसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. संदीप नाईक, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, राहुल जगताप, दत्तात्रय भरणे, दिपक चव्हाण, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. पंकज भुजबळ, नरहरी झिरवाळ, सुरेशभाऊ लाड, विजय भांबळे, संजय कदम, शामराव पाटील, मकरंद जाधव-पाटील, भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, मधुसूदन केंद्रे, बबनराव शिंदे, दिलीप सोपल, शिवेंद्रसिंहराजे भोसले, मनोहरर नाईक, संग्राम जगताप, सर्वश्रीमती सुमन पाटील, ज्योती कलानी, सर्वश्री अवधूत तटकरे, प्रदीप जाधव-नाईक, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील १६ शासकीय महाविद्यालयांना शस्त्रक्रिया उपकरणांचा पुरवठा ऑल फूड अँड ड्रग लायसन्स होल्डर फाऊंडेशनच्या माध्यमातून होत असणे, परंतु शासनाने पुरवठादाराचे ९० कोटी रूपये थकविल्याने माहे ऑक्टोबर, २०१८ पासून उपकरणांचा पुरवठा बंद करण्याचा निर्णय सदर फाऊंडेशनने घेणे, त्यामुळे उपकरणांअभावी शस्त्रक्रिया करणे शक्य होणार नसल्याने वैद्यकीय महाविद्यालयांना पडलेला पेच, रूग्णांवर त्याचा होणारा परिणाम, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने थकीत निधी, त्वरित देण्याबाबत आदेश देऊनही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यात लक्ष घालून पुरवठादाराचे थकीत ९० कोटी रूपये तातडीने देण्याबाबत केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

*******

### मा.मंत्री (वैद्यकीयशिक्षण) यांचेनिवेदन

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२६.०७.२०१७ च्या आदेशानुसार राज्यातीलविविध रूग्णालयात लागणारी औषधे व शल्योपचार साहित्यांची खरेदी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या खरेदी कक्षाकडून करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या खरेदीची निविदा प्रक्रिया होण्यास काही कालावधी लागणार असल्याने औषधांचा पुरवठा सुरळीत होईपर्यंत रूग्णसेवेत खंड पडू नये म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रूग्णालये यांच्याकडून औषधे व शल्योपचार साहित्याची खरेदी दरकरारावर करण्यात येते. याबाबत प्रचलित प्रतिमहा आर्थिक मर्यादेच्यावर औषधांची खरेदी झाल्यास सदर अधिकच्या खरेदीच्या देयकांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी व अन्वेषण प्रमाणपत्रासाठी शासनास सादर करण्यात येतात. शासनास प्राप्त प्रस्तावांची छाननी करून परिपूर्ण प्रस्तावाच्या

अनुषंगाने प्रशासकीय मान्यता वा अन्वेषण प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते. याबाबत जसे प्रस्ताव प्राप्त होत आहेत तशी त्यांना मान्यता देण्यात येत असून, शासनास प्राप्त परिपूर्ण प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता / अन्वेषण प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्यक्षात पुरवठादारांनी औषधांचा पुरवठा बंद केलेला नाही.

तसेच स्थानिक स्तरावर तातडीच्या प्रसंगी औषधे उपलब्ध व्हावे व रूग्णसेवेत खंड पडू नयेत यासाठी अधिष्ठाता यांचे स्थानिक स्पॉट खरेदीची मर्यादा रू.५,०००/-वरून रू.१,००,०००/- प्रतिदिन इतकी वाढविण्यात आली आहे. तसेच, मंजूर वार्षिक अनुदानाच्या १० टक्के स्थानिक खरेदीची मर्यादा २० टक्क्यापर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तसेच, संस्था पातळीवर दारिद्र्य रेषेखालील रूग्णांना अधिष्ठाता यांच्या स्वीय प्रपंची खात्यातून स्थानिक पातळीवर खरेदी करून औषध पुरवठा करण्यात येतो. अशाप्रकारे रूग्णालयांमध्ये औषधे व शल्योपचार सामुग्रीचा तुटवडा भासणार नाही आणि रूग्णसेवेत खंड पडणार नाही, याची काळजी घेतली जाते.

सन २०१८-१९ या वर्षामध्ये औषधे व शल्योपचार सामुग्रीसाठी एकूण रू.३३९.५० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून यापैकी, औषधांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी रू.११७.२१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, रू.११६.५८ कोटी इतका निधी हाफकिन महामंडळामार्फत औषधे खरेदी करण्यासाठी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित निधी वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्याची कार्यवाही सूरू आहे. वितरीत निधीमधून औषधे व शल्योपचार साहित्याच्या खरेदीची देयके संस्थास्तरावर अदा करण्यात येत आहेत.

*-*-*-*-*-*-*

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री.राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो. आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यंबकराव भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, श्री. अब्दुल सत्तार, ॲड. यशोमती ठाकूर, श्री. सुभाष पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी पुढीलप्रमाणे :-

"सन २०१० साली नव्या तंत्रज्ञानातून हिप शस्त्रक्रिया करून घेतलेल्या राज्यातील रूग्णांची संख्या सुमारे ४५० इतकी असून, यापैकी बऱ्याच रूग्णांना हिप शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात आलेल्या जॉन्सन कंपनीच्या इम्प्लांटमध्ये दोष आढळून येऊन, त्यातून झालेला संसर्ग, त्यामुळे काही जणांना आपला जीव गमवावा लागल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये निदर्शनास येणे, या पिडीत रूग्णांना न्याय मिळवून देण्याकरिता पुढील तपासाकरिता केंद्र शासनाने गठीत केलेली समिती, त्यामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांचा असलेला समावेश, हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेकरिता वापरण्यात येणाऱ्या (इम्प्लांटस) उपकरणांमध्ये, दोष आढळल्याने राज्यातील सुमारे ४५० रूग्णांना बसलेला फटका, डेप्यू या जॉन्सन ॲण्ड जॉन्सन उप कंपनीने २००८ साली हिप रिप्लेसमेंट या शस्त्रक्रियेसाठी पाठविलेले इम्प्लॉट, शस्त्रक्रियेत वापरण्यात आलेल्या या इम्प्लॉटमुळे रूग्णांना त्या जागी संसर्ग झाल्याचे तसेच काही रूग्णांचा मृत्यू झाल्याचे दोन वर्षानी उघडकीस येणे, याप्रकरणी रूग्णांना डॉक्टरांकडे तक्रार करून, नुकसान भरपाईची केलेली मागणी, याबाबत पोलीस एफडीए व कंपनीकडे दाद मागितली असता, सदर प्रकरण दाबण्याचा झालेला प्रयत्न, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.'

**********

## मा. मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

मे. जॉन्सन अॅन्ड जॉन्सन लि. मुंबई या कंपनीच्या मे. डेप्यू आर्थोपेडिक इंक या उपकंपनीने उत्पादित केलेल्या ए.एस.आर. मेटल हिप इम्पलेंन्टस या मेडिकल डिव्हाईसेस बाबत दिनांक १७.०३.२०११ रोजी अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, मुंबई या कार्यालयात प्राप्त निनावी तक्रारी अनुषंगे सहायक आयुक्त (औषधे) (मुख्यालय) यांनी केलेल्या चौकशीत सदर कंपनीच्या मेडिकल डिव्हायईसेसमधून कोबाल्ट व क्रोमियम या धातूंची गळती होत असल्याने सदर उत्पादक कंपनीने ऑगस्ट २०१० पासून युएसए, कॅनडा, ब्राझिल व भारतात विक्री/निर्यात केलेला सदोष इंम्पलांटचा साठा परत मागविला असल्याचे निदर्शनास आले होते.

दिनांक १९.११.२०११ रोजी मे. De Puy Medical Private Limited विरुध्द माहिम पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड संहिता व औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीअंतर्गत गुन्हा क्रमांक ४३५/२०११ नोंदविण्यात आला असून या संदर्भात पोलीस अधिकाऱ्यांकडून तपास सुरू आहे. याबाबत मे. DePuy Medical Private Limited या कंपनीने त्यांचेविरुध्द दाखल केलेला प्रथम खबर अहवाल रद्द करण्यासाठी

मा.बॉम्बे उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका क्रमांक १३३८/२०११ ही फेटाळण्यात येऊन गुन्हयाचा पुढील तपास सुरू ठेवण्याबाबत मा.न्यायालयाने आदेशित केले. सदर प्रकरण जनहिताच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सी.बी.आय.) सोपविण्याची विनंती करण्यात आली होती. तथापि, मनुष्यबळा अभावी सी.बी.आय. ने सदर प्रकरणी तपास करण्यास नकार दिल्याचे कळविले आहे.

अन्न व औषध प्रशासनास प्राप्त माहितीनुसार सुमारे १५८२९ इम्प्लांट्स भाग भारतात आयात करण्यात आले असून भारतात सुमारे ४७०० सर्जरीसाठी या इम्प्लांटचा वापर करण्यांत आला आहे. त्यातील १२५५ सर्जरी महाराष्ट्रात करण्यात आल्या आहेत. १२५५ इम्प्लांट्स भाग परत करण्यात आले आहेत. दोन रुग्णांच्या रक्त नमुन्यांत क्रोमियम व कोबाल्ट या धातूचा अंशाबाबत तज्ञांचा अभिप्राय घेण्यास्तव प्रकरण जे.जे. समुह रुग्णलयाच्या विशेष कमिटीकडे वर्ग करण्यात आले होते. मात्र या चाचणीची नियमित तपासणी न झाल्यामुळे रक्तात आढळून आलेले दोष मेटल प्रोस्तेसीसमुळेच असल्याचे अभिप्राय देण्यासंदर्भात तज्ञांनी असमर्थता दर्शविली आहे.

केंद्रीय आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.०८.०२.२०१७ डॉ. अरूण कुमार यांच्या अध्यक्षतेखली ११ सदस्यीय समिती नेमली होती. सदर समितीने दि.१९.०२.२०१८ रोजी विस्तृत अभ्यास करुन अहवाल सादर केला असून सदर अहवालातील अ) केंद्रीय तज्ञ समिती व राज्यस्तरीय समिती गठीत करणे, आ) ASR HIP Implant चा वापर केलेल्या रूग्णांना किमान २० लाख रूपये इतकी नुकसान भरपाई निश्चित केली गेली, इ) या संदर्भात वर्तमानपत्रात राज्य सरकारद्वारे जाहिरात देणे. या शिफारशी केंद्र शासनाने स्विकारल्या आहेत.

दि.३०.०८.२०१८ च्या आदेशान्वये केंद्रीय आरोग्य तथा कुटूंब कल्याण, मंत्रालय यांनी केंद्रीय तज्ञ समिती गठित केली असून सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशाच्या प्रमुख आरोग्य सचिवांना दिलेल्या निर्देशानुसार राज्यशासनाने दि.२५.१०.२०१८ नुसार राज्य स्तरीय समिती गठित करण्यात आली असून दि.०१.११.२०१८ व दि.१४.११.२०१८ रोजी समितीच्या ०२ बैठका झालेल्या आहेत. तसेच जाहिरात देण्यासाठी दि.०५.११.२०१८ रोजी संचालक (जाहिरात), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांना व सदर प्रकरणास प्रसिध्दी देण्यासाठी दि.१६.११.२०१८ रोजी सहायक संचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांना कळविण्यांत आले आहे. सदर प्रकरणात बाधित रुग्णांना प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य व मदत करण्यात येत आहे.

H 1152-2a.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री.सुनिल प्रभु, जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगतसिंह पाटील, संदीप नाईक, अस्लम शेख, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, वैभव पिचड, सुरेश लाड, किसन कथोरे, दिपक चव्हाण, हनुमंत डोळस, ॲड राहुल कुल, सर्वश्री.राधाकृष्ण विखे पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सुनिल केदार, अमर काळे, पृथ्वीराज चव्हाण, डी.पी.सावंत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री.बसवराज पाटील, कुणाल पाटील, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री. कालीदास कोळंबकर, भारत भालके, हर्षवर्धन सपकाळ, अमित देशमुख, श्रीमती.अमिता चव्हाण, सर्वश्री.शेख असिफ शेख रशिद, अब्दुल सत्तार, श्रीमती निर्मला गावीत, श्री.अबु आजमी, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री.राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, राहुल मोटे, राहुल जगताप, दत्तात्रय भरणे, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. पंकज भुजबळ, विजय भांबळे, संजय कदम, बाळासाहेब पाटील, मकरंद जाधव-पाटील, भाऊसाहेब पाटील-चिकटगावकर, डॉ.मधुसुदन केंद्रे, सर्वश्री. बबनराव शिंदे, दिलीप सोपल, शिवेंद्रसिंहराजे भोसले, मनोहर नाईक, संग्राम जगताप, सर्व.श्रीमती.सुमन पाटील, ज्योती कलाणी, सर्वश्री.अवधुत तटकरे, प्रदिप जाधव-नाईक, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, ॲड.पराग अळवणी, कॅप्टन आर.तमील सेल्वन, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री.नरेंद्र पवार, नरेंद्र महेता, मो.आरिफ नसीम खान, अमीन पटेल, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री.जयकुमार गोरे, मधुकरराव चव्हाण, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी पुढीलप्रमाणे:-

"मुंबईत दसरा दिवाळी या सणासुदीच्या काळात मुंबईकर जनतेस निर्मळ, दर्जेदार आणि सकस दूध पुरविठा व्हावा यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राबविलेल्या तपासणी मोहिमेअंतर्गत दिनांक १७/८/२०१८ रोजी नामांकित ब्रँड चे सुमारे ३ लाख ४४ हजार लिटर भेसळयुक्त दूध जप्त केल्याची घटना घडणे, सदर होऊन जप्त केलेल्या भेसळयुक्त दूध जप्त केल्याची घटना घडणे, सदरहू जप्त केलेले भेसळयुक्त दुध मदर डेअरी, वारणा दूध नाशिक, श्रीरंग किसनलाल सारडा, हेरिटेज फुड लि. अग्रवाल मिल्क प्रोडक्टस आदी नामांकित ब्रँडचे असल्याने, सामान्य जनता सहजरीत्या खरेदी करीत असणे, हेरिटेज फुड लि. सातारा, फलटण या कंपनीच्या दुधात स्टार्च आणि अमोनियम सल्फेट आढळून येणे, तसेच कंपनीत छापा टाकला असता १७ लाख रुपयाची १२०० किलो भेसळयुक्त दूध पावडर आढळून येणे, या घटनेमुळे मुंबईतील जनतेस दररोज लाखो लिटर भेसळयुक्त दूध प्यावे लागत असल्याचा अत्यंत गंभीर प्रकार निदर्शनास येणे, दुधाला पुर्ण अन्न म्हणून मान्यता असून घराघरात अबाल वृद्ध दुध पित असून, दुधापासून खवा, दही, पनीर, चीज, आइस्क्रीम व विविध प्रकारच्या मिठाई तयार केल्या जात असणे, भेसळयुक्त दुधामुळे मुंबईकर जनतेच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका दररोज लाखो नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या नराधम भेसळखोर व त्याचे सूत्रधारांवर शासनाने मोक्का सारखा कायदा लावून कठोर कारवाई करण्याचे अनेक वेळा आश्वासन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मुंबईतील जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

### मा.मंत्री (अन्न व औषध) यांचे निवेदन

मुंबईत दसरा दिवाळी या सणासुदीच्या काळात मुंबईकर जनतेस निर्मळ, दर्जेदार आणि सकस दूध पुरविठा व्हावा यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने तपासणी मोहिम दि.१७/०८/२०१८ रोजी राबविली ही बाब खरी नाही. तथापि, अन्न व औषध प्रशानाने मुंबईतील जनतेला निर्भेळ व सकस दुधाचा पुरवठा होण्यासाठी दि.१६.१०.२०१८ रोजी रात्री १०.०० वाजल्यापासून ते दिनांक १७.१०.२०१८ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत मुंबई शहर व उपनगरात प्रवेश करणाऱ्या मानखुर्द, दहिसर, मुलुंड पूर्व, मुलुंड पश्चिम व ऐरोली या पाच नाक्यांवर बाहेरून येणाऱ्या दुधाची जागेवर तपासणी केली होती. या

मोहिमेअंतर्गत ३ लाख ४४ हजार लिटर दुधाचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर तपासणी मोहिमेदरम्यान एकुण २२७ वाहनांची तपासणी करण्यात आली असून सदर प्रकरणी खातरजमा करण्यासाठी स्पॉट टेस्ट घेण्यात आलेली होती. त्यामध्ये १३ वेगवेगळ्या दुधाचे नमुने मानदाप्रमाणे नसल्याचे आढळून आले आहे. सदर तपासणीत एकूण ९,२२,३२८ लिटर दूध जाग्यावर तपासण्यात आले. यापैकी ०५ वाहनांतील एकूण ३,४४४ लिटर दूध फॅट व एस. एन. एफ. कमी आढळल्याने संबंधित पुरवठादारांकडे परत पाठविण्यात आले आहे. तर ०७ वाहनातील एकूण १९,२५० लिटर दुधात माल्टोज, सुक्रोज, अमोनिअम सल्फेट आढळल्याने नष्ट करण्यात आले. तसेच अन्न सुरक्षा मानके कायद्यामधील तरतुदीनुसार संबंधित दुधाचे १३ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आलेले होते. त्याचे अहवाल प्राप्त झाले असून सदर १३ नमुन्यांपैकी ८ नमुने मानदाप्रमाणे नसून ५ नमुने प्रमाणित प्राप्त झाले आहेत. सदर प्रकरणातील १३ नमुन्यांपैकी ०७ नमुन्यांचा अहवाल रेफरल प्रयोगशाळेत फेरतपासणीसाठी पाठविण्यात येत आहेत. अन्न व औषध प्रशासनाने दिनांक १६.१०.२०१८ रोजीच्या मोहिमेत मुंबईतील ५ जकातनाक्यांवर घेण्यात आलेल्या दुधाच्या नमुन्याच्या अनुषंगे उपरोक्त दुधाच्या पुरवठादार /उत्पादक यांचे विरुध्द संबंधित अधिकाऱ्यांनी कारवाई घेतली.

अन्न व औषध प्रशासनाने i) मे.सुदर्शन मिल्क ॲण्ड अग्रो, अहमदनगर, ii) मे.साईराज मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, राहता, अहमदनगर, iii) मे.सातराल डेअरी, अहमदनगर, iv) मे.ममता डेअरी, जळगाव, v) मे.हेरीटेज फुड लि. ता.फलटण, सातारा, vi) मे.लक्ष्मी मिल्क एजन्सीज, भोर, पुणे, vii)अग्रवाल मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट, भोर, पुणे viii) मे.श्रीराम दूध संकलन, शिरुर, पुणे ix) मे.आष्टी तालुका दुध उत्पादक ॲण्ड पुरवठा सह.मर्या., आष्टी, बीड, x) मे.दारणा दुध, नाशिक, xi) मे.दारणा दुध, नाशिक, xii) मे.श्रीरंग किसनलाल सारडा, नाशिक xiii) मे.साईकृपा डिस्ट्रिब्युटर्स, तुर्भे. या पेढ्यांच्या दुधाची टोलनाका मोहिमेदरम्यान तपासणी केली असून काही पेढ्यांच्या दुधाचे नमूने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून अहवाल अद्याप प्रलंबित आहेत. मे. हेरिटेज फूड लि.ता. फलटण, जि.सातारा या पेढीची तपासणी करून ८९८ लि. फुल क्रिम मिल्क नष्ट केले आहे. तसेच स्किम मिल्क पावडरचा १२९२४ कि.लो. किंमत १७,४४,०००/- रु. साठा जप्त केला आहे. तसेच १)Past. Homo. Cow Milk २) Past.Homo.Toned Milk ३) Past. Homo. Full Cream Milk ४) स्किम मिल्क पावडर हे नमुने विश्लेषणासाठी घेतले असून अहवाल प्रलंबित आहेत.

अन्न व औषध प्रशासनामार्फत बृहन्मुंबई विभागात दुधासाठी वेळोवेळी जकातनाका मोहिमा राबविण्यात येतात. तसेच दूध भेसळ करणाऱ्या समाजकंटकाविरोधी वेळोवेळी विशेष मोहिमा राबवून त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. राज्यामध्ये दुधामध्ये भेसळ रोखण्यासाठी वेळोवेळी विविध स्तरावरुन (जसे किरकोळ, पुरवठादार, उत्पादक) दुधाचे नमुने घेण्यासाठी विशेष मोहिमांचे आयोजन करण्यात येते. तसेच झोपडपटटी मोहिम, जकातनाका मोहिम यांचेही आयोजन करण्यात येते. अन्न व औषध प्रशासनाने एप्रिल २०१८ ते ऑक्टोबर २०१८ या कालावधीत दुधाचे ६०४ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी २१९ नमुने प्रमाणित दर्जाचे, ८२ नमुने कमी दर्जाचे तसेच ०१ नमुना मिथ्याछाप आढळले असून ३०२ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

दुधामध्ये भेसळ तसेच इतर अन्न पदार्थामध्ये भेसळ झाल्यास ते मानवी आरोग्यास अपायकारक आहे. दुध हे लहान मुलापासून ते वयोवृध्दापर्यंत दैनंदिन जीवनात आवश्यक असून त्याचे दररोज सेवन केले जाते.अशा अत्यंत संवेदनशिल प्रकरणी अन्न पदार्थातील भेसळ रोखण्यासाठी व भेसळ करणाऱ्या व्यक्ति / आस्थापना यांच्यावर वचक निर्माण करण्यासाठी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम २७२ व २७३ मध्ये दुरुस्ती सुचविण्यात आली असून सदर दुरुस्तीनुसार आता अशा प्रकारचे गुन्हे अजामीनपात्र व दखलपात्र करण्यात येवून आजन्म कारावास आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात येत आहे.

-------◆◆-------

**श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-**

**"मुंबई महानगर पालिकेच्या अखत्यारीतील के पश्चिम विभागात एकूण २७७ अनाधिकृत बांधकामे केलेली असणे यामध्ये अंधेरी (पश्चिम) मध्ये, जी. रेस्टोरन्ट द धाबा रेस्टोरन्ट, हिरापन्ना मॉल, सम्राट ऐशवर्या बिल्डिंग इत्यादी सदर अनाधिकृत बांधकामुळे चटईक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाढ केलेली असल्याचे माहे २०१८ मध्यें उघडकीस येणे, त्यामुळे रहिवाश्यांच्या जीवाला आगीचा तसेच ईमारत कोसळून होणाऱ्या दुर्घटनेत धोका असणे या अनाधिकृत बांधकामाबाबत तसेच अनाधिकृत पणे चटई क्षेत्रामध्ये वाढ केल्या बाबत श्री शकील पटनी यांनी मा. मुख्यमंत्री, महापालिका आयुक्त उपायुक्त परिमंडळ,-४, सहाय्यक आयुक्त, के-पश्चिम व उपायुक्त, अनाधिकृत निष्कासन यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ पासून वारंवार लेखी स्वरुपात २७७ इमारती कोणत्या आहेत त्यांच्या नांवा सह तिथे कशा प्रकारचे अनाधिकृत बांधकाम झाले आहे व अनाधिकृत चटई क्षेत्रात कशी वाढ केली या संदर्भातील सविस्तर तक्रारी करुनही संबंधित अधिकाऱ्यांने त्यांच्याकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केल्याने अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, या प्रकरणी बिल्डर व अधिकाऱ्यांमध्ये करोडो रुपयांचा आर्थिक देवाण घेवाण झालेला असून. त्यामुळे या वार्डात मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकाम झालेले असणे, या परिसरातील लोकांच्या जीवाला धोका असल्याने सदरहु बांधकामावर तातडीने कारवाई करुन अनाधिकृत बांधकाम करणारे व तक्रारी करुनही कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका"**

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागामध्ये 'श्रीजी रेस्टॉरन्ट' लिंक प्लाझा, ओशिवरा येथील उपहारगृहासमोरील मोकळ्या जागेतील अनधिकृत बांधकामास सन २०१७ मध्ये महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. तद्नंतर सदरचे अनधिकृत बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले.

मुंबईतील ओशिवरा येथील 'द धाबा रेस्टारेन्ट' व लिंक प्लाझा या उपाहारगृहास सन २०१७ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५५ अंतर्गत उपहारगृहासमोरील मोकळ्या जागेतील अनधिकृत शेडला नोटीस बजावण्यात आली होती. तद्नंतर सदरचे अनधिकृत बांधकाम महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले.

तसेच 'हिरपन्ना मॉल' येथील वाईल्ड डायनिंग उपहारगृहाच्या लगत असणा-या खुल्या गच्चीवरील बांधकामास सन २०१८ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. तद्नंतर सदरचे अनधिकृत बांधकाम महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत दिनांक २३.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार, म्हाडा प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जा प्राप्त झाला असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागात जे.व्ही.पी.डी. म्हाडा वसाहत, डी.एन. नगर, आझाद नगर, ओशिवरा म्हाडा वसाहत, आदर्श नगर वसाहत या वसाहती येतात. तथापि, श्रीजी रेस्टॉरन्ट, दि धाबा रेस्टॉरन्ट, हिरा पन्ना मॉल इत्यादी बांधकामे ओशिवरा वसाहतीमधील अनिवासी/वाणिज्य बांधकामे आहेत.

श्रीजी रेस्टॉरन्ट व दि धाबा रेस्टॉरन्ट ही दोन रेस्टॉरन्ट्स ओशिवरा लिंक प्लाझा कमर्शिअल प्रिमायसेस को.ऑप. सोसायटी लि. या मुंबई मंडळामार्फत बांधलेल्या वाणिज्य इमारतीत येतात. सदर दोन रेस्टॉरन्ट्स व इतर अनिवासी सदनिकाधारकांनी मूळ बांधकामात बदल किंवा अनधिकृत बांधकाम केल्याचे मुंबई मंडळाच्या निदर्शनास आल्यामुळे सदर अनधिकृत बांधकामाबाबत सदर वाणिज्य इमारतीतील अनिवासी सदनिकाधारकांच्या ओशिवरा लिंक प्लाझा कमर्शिअल प्रिमायसेस को.ऑप.सोसा.लि. या संस्थेस म्हाडा प्राधिकरणामार्फत दिनांक २४.१२.२०१८ रोजी नोटीस देण्यात आली आहे. सदर नोटीसमध्ये गाळयांचे एकत्रीकरण, रचनेत बदल, जिना, पॅसेज इत्यादींचा वापर, जल जोडणी व गच्चीवरील टाक्या याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र किंवा इतर याबाबतची कागदपत्रे सादर करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे. तसेच, नियमानुसार निष्कासनाची कार्यवाही करण्याबाबतची दक्षता म्हाडा प्राधिकरणामार्फत घेण्यात येत आहे.

******

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१८ च्या (हिवाळी) अधिवेशनातील महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.

सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री अस्लम शेख, अमीन पटेल, अमित देशमुख, अमर काळे, सुनिल केदार, सुभाष पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमा गे आहे:-

" महाराष्ट्र वैद्यकीय परिषद व भारतीय वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी नसतानाही, रुग्ण अहवालावर स्वाक्षरी केल्याप्रकरणी घाटकोपर (मुंबई) येथील सोहम हेल्थकेअर या लॅब मधील सही करणाऱ्या संबंधितांवर माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये दाखल करण्यात आलेला गुन्हा मा. सर्वोच्च न्यायालयाने १२ डिसेंबर, २०१८ रोजी पॅथॉलॉजी लॅब अहवालासंदर्भात दिलेल्या आदेशानुसार रुग्ण अहवालावर नोंदणीकृत उच्च शिक्षीत पॅथॉलॉजीस्टचीच स्वाक्षरी असणे बंधनकारक असणे, मा. सर्वोच्च न्यायालय व मानवी हक्क आयोगाच्या निर्देशानुसार राज्य शासनाने बोगस लॅब व पॅथॉलॉजीस्टवर कारवाई करण्याचे आदेश देण्याची आवश्यकता असताना, शासनाकडून याप्रकरणी होत असलेली टाळाटाळ, राज्यातील बोगस पॅथॉलॉजिस्टवर कारवाई न केल्यामुळे त्यांची वाढणारी हिंमत, बोगस पॅथॉलॉजिस्टवर कारवाई करण्याची मागणी, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट ॲण्ड मायक्रो बायोलॉजिस्ट या संघटनेने शासनाकडे करुनही, त्याची दखल न घेणे, बोगस पॅथॉलॉजिस्टचा धंदा राज्यात मोठया प्रमाणात फोफावणे, मुंबईसह राज्यात १० हजारांच्यावर तर मुंबईच्या आसपास ७०० ते ८०० असलेले बोगस पॅथॉलॉजी लॅब, अशा लॅब मध्ये टेक्निशियनच लॅब चालवित असणे, एकच डॉक्टर ३ व ४ वेगवेगळया लॅबमध्ये न जाता कोऱ्या लेटर हेडवर सही करुन बोगस लॅबला देण्यात येणे, परिणामी बोगस पॅथलॉजिस्टमुळे रुग्णाचे होणारे चुकीचे निदान त्यामुळे चुकीचा होणारा औषधोपचार, परिणामी रुग्णांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**श्री. गिरीष महाजन, मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री, यांचे निवेदन**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद व भारतीय वैद्यकीय परिषदेत नोंदणी नसतानाही डॉक्टर ही पदवी लावून "सोहम हेल्थ केअर पॅथॉलॉजी सेंटर, घाटकोपर (पूर्व), मुंबई या ठिकाणी रुग्णांच्या वैद्यकीय तपासणी अहवालावर डिजिटल स्वाक्षरी करणाऱ्या जसवंतसिंग गुरुचरण सलुजा विरुध्द बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील संबंधीत पंतनगर पोलीस ठाण्यात, भा.दं.वि.कलम ४२०, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ कलम ३३(२),३६ भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ कलम १५(३) अन्वये दि. १५.०८.२०१८ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टीसिंग पॅथॉलॉजीस्ट ॲन्ड मायक्रोबायोलॉजिस्ट या संघटनेकडून महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे सन २०११ मध्ये एकूण ५ पॅथॉलॉजीस्ट विरुध्द तक्रार करण्यात आली ज्यामध्ये संबंधीत व्यवसायिक अनेक पॅथॉलॉजी लॅब मध्ये न जाता वैद्यकीय चाचण्याच्या रिपोर्टवर स्वाक्षरी करत असल्याबाबत व एकच पॅथॉलॉजीस्ट एकाच दिवशी विविध पॅथॉलॉजी लॅबमध्ये जात असल्याबाबतच्या तक्रारी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे प्राप्त झाल्या होत्या. तदनंतर या ५ नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी (पॅथॉलॉजीस्ट) विरुध्द तक्रारींवर नियमाप्रमाणे सुनावणी

घेण्यात आली. यापैकी एका वैद्यकीय व्यवसायिकाची निर्दोष मुक्तता करण्यात आली असून, उर्वरित ४ व्यवसायिकांविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ मधील कलम २२ नुसार त्यापैकी ३ वैद्यकीय व्यवसायीकांचे नावे नोंदणी पुस्तकामधून ६ महिन्यासाठी कमी करण्यात आले असून, एका वैद्यकीय व्यवसायिकाने चूक मान्य करुन यापुढे असे करणार नाही असे हमीपत्र परिषदेस लिहून दिले आहे. यास्तव या व्यावसायिकाचे नाव एक दिवसासाठी नोंदणी पुस्तकातून कमी केले होते. याव्यतिरिक्त अन्य चार वैद्यकीय व्यवसायिकांविरुध्द वर्ष २०१५, २०१६,२०१८ मध्ये तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांच्या सुनावणीची प्रक्रिया परिषद स्तरावर सुरु आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, दिनांक १२.१२.२०१७ रोजी दिलेल्या आदेशात विकृतिचिकित्सा प्रयोगशाळेचे अहवाल फक्त, विकृतिशास्त्रामधील उच्च पदवी धारण करणारा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी प्रतिस्वाक्षरी (counter signed) करु शकतो, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने त्यांच्या दिनांक २२.०१.२०१८ च्या आदेशात दिनांक २६.०५.२०१६ चा शासन निर्णय रद्द करणे आणि दिनांक २४.०५.२०१६ च्या शासन परिपत्रकाची अंमलबजावणी करणे याबाबत शिफारस केली आहे.

कारण यापूर्वी नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी असल्याखेरील विकृतिचिकित्सा तपासणी अहवाल प्रमाणित करणे हा अवैध व्यवसाय ठरत असल्याने शासनाने दिनांक २४.०५.२०१६ रोजी अशा व्यक्तींवर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ च्या कलम ३३ अनुसार कारवाई करण्याबाबत शासन परिपत्रक निर्गमित केले होते. परंतु राज्यात नोंदणीकृत पॅथॉलॉजिस्टची संख्या आणि जनतेच्या आरोग्यासंबंधी गरजा विचारात घेता व बहुसंख्य नोंदणीकृत विकृतीशास्त्रज्ञ हे राज्याच्या नागरीक्षेत्रामध्ये व्यवसाय करीत असल्याने, राज्याच्या ग्रामीण क्षेत्रामधील जनतेला विकृतीचिकित्सा तपासण्यांची सुविधा तपासण्यांची सुविधा तत्परतेने उपलब्ध व्हावी. यादृष्टीने शासनाने दिनांक २४ मे,२०१६ नुसार निर्गमित केलेले परिपत्रक दिनांक २६ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये तात्काळ प्रभावासह तहकुब केले होते. त्याअनुषंगाने यापूर्वी यासंदर्भात वेळोवेळी काढण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमित करुन व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १२.१२.२०१७ चे आदेश लक्षात घेऊन सुधारित आदेश निर्गमित करणे शासनाच्या विचाराधीन आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, दिनांक १२.१२.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांनी एमसीआयच्या दि. १४.१२.२०१७ च्या पत्राच्या अनुषंगाने नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी पर्यवेक्षणाशिवाय विकृतिचिकित्सा अहवाल प्रमाणित करु नयेत या आशयाचे परिपत्रक प्रसिध्द केले.

तसेच, दरम्यानच्या काळात राज्यातील परावैद्यक व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची नोंदणी करण्यासंबंधी विवक्षीत नियमन करण्यासाठी परावैद्यक परिषदेची स्थापना करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगीक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र परावैद्यक परिषद

अधिनियम २०११ दि. ३० जानेवारी २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आला असून दि. १८ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या अधिसूचनेनुसार ही परिषद स्थापन झाली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र परावैद्यक परिषदेचे **RULES & REGULATIONS** प्रत्यक्षात अंमलात येऊन त्यानुसार राज्यातील परावैद्यक व्यवसायांची नोंदणी, नोंदणीकृत परावैद्यकीय व्यवसायविषयक वर्तणूकीचे विनियम, त्यांचेविरुध्द निलंबन अथवा शिस्तभंगाची कार्यवाही करणे तसेच, अनधिकृत लॅब धारकांविरुध्द कठोर कारवाई करणे शासनास शक्य होणार आहे. यामुळे सामान्य रुग्णांची मोठया प्रमाणात होत असलेली आर्थिक लूट व शोषण तसेच रुग्णांच्या जिविताला होणारा धोका टाळणे शक्य होईल.

********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री. सुनिल शिंदे, सुनिल प्रभु, अमित देशमुख, राधाकृष्ण विखे-पाटील, बाळासाहेब थोरात, अमिन पटेल, अस्लम शेख, मो.आरिफ नसीम खान, डॉ. संतोष टारफे, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. त्र्यंबकराव भिसे, कुणाल पाटील, मनोहर भोईर, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, राणाजगजीतसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहूल मोटे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. संदीप नाईक, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, राहुल जगताप, दत्तात्रय भरणे, दिपक चव्हाण, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. पंकज भुजबळ, नरहरी झिरवाळ, सुरेश लाड, विजय भांबळे, संजय कदम, बाळासाहेब पाटील, मकरंद जाधव-पाटील, भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, मधुसूदन केंद्रे, सर्वश्री.बबनराव शिंदे, दिलीप सोपल, शिवेंद्रसिंहराजे भोसले, मनोहर नाईक, संग्राम जगताप, सर्वश्रीमती सुमन पाटील, ज्योती कलानी, सर्वश्री. अवधूत तटकरे, प्रदीप जाधव-नाईक, सर्वश्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर,तृप्ती सावंत, सर्वश्री. योगेश सागर, वैभव नाईक विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"तळोजा येथील एम.आय.डी.सी. तील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट या रासायनिक घनकचरा विघटन करणाऱ्या कंपनीत दि. २९ ऑक्टोबर, २०१८ रोजी सकाळी ८.१५ वा. च्या सुमारास झालेला भीषण स्फोट, या भीषण स्फोटामुळे सभोवतालच्या सुमारे १५ कि.मी. परिसर हादरला असून या अपघातात एक जण गंभीर झाल्याची, तसेच परिसरातील १४ गावातील अनेक घरांना तडे गेल्याची आणि अन्य मालमत्तेचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असल्याची बाब समोर आलेली असणे, या औद्योगिक वसाहतीतील रासायनिक प्रदुषणामुळे परिसरातील रहिवासी त्रस्त असून याबाबत वारंवार तक्रारी, निदर्शने आणि आंदोलने करुनही शासनाकडून दखल घेण्यात आलेली नसणे, त्यामुळे सदरहू स्फोटाच्या घटनेची तात्काळ चौकशी करुन एम.आय.डी.सी. तील कंपन्यामध्ये वारंवार होत असलेल्या स्फोटाच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि प्रतिक्रिया."

### मा.मंत्री पर्यावरण यांचे निवेदन

राज्यातील विविध ठिकाणी औद्योगिक वसाहतीतून निर्माण/ तयारा होणारा औद्योगिक घातक घनकचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी राज्यामध्ये १) मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, तळोजा २) टी.टी.सी. ठाणे ३) एम.ई.पी.एल. पूणे ४) व्ही.ई.पी.एल.नागपूर याठिकाणी सामुहीक घातक घनकचरा प्रक्रिया साठवणूक व

## महाराष्ट्र विधानसभा सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**मा. श्री. अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

**"यवतमाळ जिल्ह्यातील मार्की-मांगली कोल माईन झरी, अडेगाव लाईम स्टोन अंड डोलोमाईट माईन, ईशान मायनिंग प्रा.लि., वेस्टर्न कोलफिल्ड प्रा.लि., वणी, जि. यवतमाळ तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील खणीकर्म उद्योगात फार मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हाणी होऊन या भागातील लाखो नागरीकांच्या आरोग्यावर फार मोठा परिणाम होऊन ते अनेक आजारांनी त्रस्त असणे, खाण उद्योगातील मूळ कंपनीने खणीकर्माचे उद्योग दुसऱ्या कंपनीला विकले असणे, त्यांचे हस्तांतरण होणे आवश्यक असतानाही हस्तांतरण न करणे व पर्यावरण विभागाची परवानगी घेतली नसल्याचे ऑक्टोबर, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात लोकप्रतिनिधीनि भेट दिली असता निदर्शनास येणे, यात फार मोठ्या प्रमाणात शासनाच्या कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडविला जात असणे वा कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे शासनाच्या महसुलात फार मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, या जिल्ह्यांना खनिकर्म अधिकारी व पर्यावरण अधिकारी यांनी वर्षानुवर्ष भेट न देणे पर्यावरण विभागाचे या भागाचे सहसंचालक यांनी फक्त कार्यालयाला भेट देणे, प्रत्यक्ष कोणत्याही खान उद्योगाला भेट न देणे, गौण खनिजाच्या माध्यमातून अब्जावधी रुपयांची कंपनीने रॉयल्टी न भरणे, त्याकडे शासकीय अधिकाऱ्यांनी जाणूनबूजून दुर्लक्ष असणे, तसेच येथील पाणी दुषित झाले असून याकडे पर्यावरण अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असणे, याबाबत महालेखापालांच्या आक्षेपात नोंद घेवूनही कंपनीने व पर्यावरण अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही न करणे, या मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे दिसून येणे, वरिष्ठ पर्यावरण अधिकारी ती जिल्हास्तरीय [illegible] अधिकाऱ्यापर्यंत सार्वजन जाणूनबूजून दुर्लक्ष करणे यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व जीवनावर होत असलेला दुष्परिणाम, राज्य शासनाच्या कोटयावधी रुपयाच्या महसूल बुडविणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची भूमिका."**

- - - - - - -

## मा. श्री.रामदास कदम, मंत्री (पर्यावरण) यांचे निवेदन

चंद्रपूर व यवतमाळ या जिल्हयामध्ये खनिज संपत्ती विपुल असून या मध्ये प्रामुख्याने आयर्न ओर, लाईम स्टोन, कोळसा व डॉलोमाईट खनिजांचा समावेश आहे. या जिल्हयामध्ये एकूण ३८ कोळसा खाणी आहेत. त्यापैकी ०६ खुल्या व ०४ भूमिगत पध्दतीच्या अशा एकूण १० खाणी सद्यस्थितीत कार्यरत आहेत.

मार्की-मांगली -१ कोळसा खाण प्रकल्प (बी.एस.इस्पात लि.) हा खाण पट्टा मे. टॉपवर्थ ऊर्जा ॲण्ड मेटल्स लि. या खाजगी समुहाने केंद्र शासनाच्या कोळसा मंत्रालयाच्या जाहीर लिलाव पध्दतीने घेतलेला आहे. या उद्योगाने केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून बी.एस.इस्पात लि. यांना मिळालेली पर्यावरण विषयक मंजुरी त्यांच्या नावे वर्ग करुन घेतली आहे. या उद्योगाच्या हवेच्या पृथ:करण अहवालानूसार प्रदूषकांचे प्रमाण आढळून आल्यामुळे हवा व जल प्रदूषण सनियंत्रण व्यवस्थित न चालवणे या कारणास्तव जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३अ व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम ३१अ अन्वये दि.१५.१०.२०१८ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.

श्री टी आर मिश्रा अडेगाव लाईमस्टोन व डोलोमाईट माईन) गट नं ६३१, अडेगांव ता झरीजामणी जि यवतमाळ या उद्योगाने पर्यावरण विषयक अनुमती घेतलेली आहे. परंतू सदरची पर्यावरण विषयक अनुमती मे. ईशान मिनरल्स प्रा लि यांच्या नावावर वर्ग करुन घेतलेली नाही. या उद्योगाच्या हवेच्या पृथ:करण अहवालानूसार वातावरणीय हवेत प्रदूषकांचे प्रमाण आढळून आल्यामुळे जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३अ व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम ३१अ अन्वये प्रस्तावित निर्देश दि.१५.१०.२०१८ रोजी देण्यात आले आहेत.

मे. जगती माईनिंग कंपनी प्रा लि ख क्र २, अडेगांव झरीजमाणी, जि यवतमाळ हा उद्योग क्रश्ड लाईमस्टोन व डोलोमाईटचे खडीकरण करीत असून उद्योगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन घेतलेले संमतीपत्र २०२१ पर्यंत वैध आहे. या उद्योगाची तपासणी केली असता हवेच्या पृथ:करण अहवालानुसार वातावरणीय हवेच्या प्रदूषकांचे प्रमाण आढळून आल्यामुळे जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३अ व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम ३१अ अन्वये प्रस्तावित निर्देश दि.१५.१०.२०१८ रोजी देण्यात आले आहेत.

चंद्रपूर जिल्हयातील औद्योगिक क्षेत्राकरीता व यवतमाळ जिल्हयातील वणी क्षेत्राकरीता हवेच्या गुणव व्यवस्थापन व आराखडा बनविण्याकरिता भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई व राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्था यांना कार्यादेश प्रदान करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने वणी क्षेत्राचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालात करण्यात आलेल्या शिफारसीनुसार शासनाच्या विविध विभागांना व परिसरातील उद्योगांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत निर्देश देण्यात आले आहेत.

यवतमाळ जिल्ह्यातील मार्की-मांगली कोल माईन झरी, अडेगाव लाईम स्टोन अंड डोलोमाईट माईन, ईशान मायनिंग प्रा.लि, वेस्टर्न कोलफिल्ड प्रा.लि., वणी या सर्व खाणी प्रमुख खनिज कोळसा, चुनखडक व डोलोमाईट करिता केंद्र व राज्य शासनाकडून निष्पादनापासून ३०/५० वर्षांकरिता मंजूर करण्यात आलेल्या असल्याने सदर खाणींमधून गौण खनिजांची (गिट्टी, बोल्डर, मुरुम, माती इ.) विक्री केली जात नाही.

जिल्हाधिकारी ,यवतमाळ यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मे. वेस्टर्न कोल फिल्ड, मे. टॉपवर्थ उर्जा व मेटल लि. व मे. ईशान मिनरल लि. यांनी उत्पादन व विक्री केलेल्या खनिजाचे नियमानुसार स्वामित्वधन शासनजमा केले आहे. तसेच भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनाय, नागपुर, खाण सुरक्षितता डायरेक्टर जनरल ऑफ माईन्स सेफ्टी, भारतीय खाण ब्युरो, श्रम आणि रोजगार मंत्रालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पोलीस विभाग, महसूल विभाग यांचमार्फत सदर खाणींना भेटी देऊन वेळोवेळी पाहणी करण्यात येते.

जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपुर यांचेकडून प्राप्त अहवालानूसार मागील तीन वर्षांमध्ये श्वसनसंस्थेचे आजार, त्वचेचे आजार आणि डोळयांचे आजार असलेल्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत नाही .

*******

# लक्षवेधी सूचना

**श्री. विरेंद्र जगताप,ॲड यशोमती ठाकूर,सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ,रणजीत कांबळे,अमीत झनक वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०५ अनुसार मांडलेली लक्षवेधी सुचना :-**

"दिनांक १ नोव्हेंबर २०१८ वा सुमारास अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खडेश्वर तालुक्यातील सामाजिक न्याय विभागक अंतर्गत शासकीय व मागसवर्गीय वसतीगृहातील विदयार्थ्यांना दि. २५ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयानुसार बहुतांश सोयी सुविधा पुरविण्यात येत नसल्याबाबत सहाय्यक आयुक्त, अमरावती यांना लेखी कळविले, दि. २५ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट १ मधील बाबी नुसार विदयार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात न येणे याकडे पूर्णता हेतुपरस्पर दुर्लक्ष करून अधिकारी व कर्मचारी कंत्राटदाराने हित जोपासत असून विदयार्थ्यांवर अन्याय करीत असणे, चांदूर रेल्वे येथील वसतीगृहातील विदयार्थीनींची तक्रार असताना येथील गृहपाल यांनी तक्रार मागे घेण्यासा पदाचा दुरूपयोग करून विदयार्थीणींना आर्थिक प्रलोभन दाखविणे व धमकाविन्याचा प्रकार घडणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १ नोव्हेंबर २०१८ रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग अमरावती यांना लेखी कळवूनही अदयाप कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, मागासवर्गीय वसतीगृहातील विदयार्थी, विदयाथीरणींना निकृष्ट आहार व इतरही सोयी सुविधंबाबत अन्याय होत असताना शासनांचे याकडे होत असलेले दुर्लक्ष याप्रकरणी दोषी अधिकारी, कर्मचारी यांचेवर कार्यवाही करून विदयार्थी, विदयार्थीनीवरील अन्याय दूर करण्याची आवश्यकता , याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका"

**श्री. राजकुमार बडोले, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे निवेदन**

अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे,धामनगांव रेल्वे व नांदगांव खांडेश्वर या तीन तालुक्यांमध्ये मागासवर्गीय मुला-मुलींसाठी एंकुण पांच शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी चांदुर रेल्वे येथील वसतीगृहातील सोयी-सुविधांबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी दि.३०.१०.२०१८ रोजी सहायक आयुक्त, समाजकल्याण,अमरावती यांचेकडे तक्रार दिली होती त्यानुसार सहायक आयुक्त, यांनी त्याच दिवशी या वसतीगृहांस भेट देऊन विदयार्थ्यांच्या तक्रारी जाणुन घेतल्या.भेटी दरम्यान भोजनाचा दर्जा तसेच साफासफाईबाबत विदयार्थ्यांनाही तक्रारी केल्याने भोजन पुरवठादाराचा ठेका बंद करुन, नविन भोजन पुरवठाधारकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. साफसफाई संदर्भात संबंधित कंपनीस नोटीस देण्यात येऊन संबधित कर्मचाऱ्यांना बदलण्यात आलेले आहे.तसेच वसतीगृहांच्या नियमित कामकाजात हलगर्जीपणा केल्याबाबत संबंधित गृहपालांना निलंबित करण्यात आलेले आहे.

RO Ha I H I 2-99 (750-1-2014)-) (पुढे चालू पृ.

२. या तिन्ही वसतीगृहातील विदयार्थ्यांना आक्टोंबर,२०१८ पर्यंत निवार्हभत्ता अदा करण्यात आलेला असून,शैक्षणिक साहित्यापोटी आवश्यक रक्कम विदयार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. तसेच या वसतीगृहांसाठी भोजन समिती स्थापन करण्यात आलेली असून वसतीगृहात भोजन चव नोंदवही ठेवण्यात आलेली आहे.वसतीगृहातील विदयार्थी यांनी मा.लोकप्रतीनिधी तसेच सहायक आयुक्त यांचेसमवेत दि.३०.१०.२०१८ रोजी चर्चा केलेली आहे त्यामध्ये विदयार्थ्यांनी तक्रारी केलेल्या नाहीत. मा.लोकप्रतीनिधी यांचे तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली असून, भोजपुरवठादारावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच साफसफाई कर्मचारी बदलण्यात आलेले आहे, तसेच वसतीगृहांच्या नियमित कामकाजत हलगर्जीपणा केल्याबाबत संबंधित गृहपालांना निलंबित करण्यात आलेले आहे. आजरोजी या वसतीगृहांचे कामकाज सुरळीत चालू आहे.

---

## लक्षवेधी सूचना

**श्री. विरेंद्र जगताप,ॲड यशोमती ठाकूर,सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ,रणजीत कांबळे,अमीत झनक वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०५ अनुसार मांडलेली लक्षवेधी सुचना :-**

"दिनांक १ नोव्हेंबर २०१८ वा सुमारास अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खडेश्वर तालुक्यातील सामाजिक न्याय विभागक अंतर्गत शासकीय व मागसवर्गीय वसतीगृहातील विदयार्थ्यांना दि. २५ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयानुसार बहुतांश सोयी सुविधा पुरविण्यात येत नसल्याबाबत सहाय्यक आयुक्त, अमरावती यांना लेखी कळविले, दि. २५ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट १ मधील बाबी नुसार विदयार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात न येणे याकडे पूर्णता हेतुपरस्पर दुर्लक्ष करून अधिकारी व कर्मचारी कंत्राटदाराने हित जोपासत असून विदयार्थ्यांवर अन्याय करीत असणे, चांदूर रेल्वे येथील वसतीगृहातील विदयार्थीनींची तक्रार असताना येथील गृहपाल यांनी तक्रार मागे घेण्यासा पदाचा दुरूपयोग करून विदयार्थीणींना आर्थिक प्रलोभन दाखविणे व धमकाविन्याचा प्रकार घडणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १ नोव्हेंबर २०१८ रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग अमरावती यांना लेखी कळवूनही अदयाप कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, मागासवर्गीय वसतीगृहातील विदयार्थी, विदयार्थीरणींना निकृष्ट आहार व इतरही सोयी सुविधंबाबत अन्याय होत असताना शासनांचे याकडे होत असलेले दुर्लक्ष याप्रकरणी दोषी अधिकारी, कर्मचारी यांचेवर कार्यवाही करून विदयार्थी, विदयार्थीनीवरील अन्याय दूर करण्याची आवश्यकता , याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका"

**श्री. राजकुमार बडोले, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे निवेदन**

अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे,धामनगांव रेल्वे व नांदगांव खांडेश्वर या तीन तालुक्यांमध्ये मागासवर्गीय मुला-मुलींसाठी एंकुण पांच शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी चांदुर रेल्वे येथील वसतीगृहातील सोयी-सुविधांबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी दि.३०.१०.२०१८ रोजी सहायक आयुक्त, समाजकल्याण,अमरावती यांचेकडे तक्रार दिली होती त्यानुसार सहायक आयुक्त, यांनी त्याच दिवशी या वसतीगृहांस भेट देऊन विदयार्थ्यांच्या तक्रारी जाणुन घेतल्या.भेटी दरम्यान भोजनाचा दर्जा तसेच साफासफाईबाबत विदयार्थ्यांनाही तक्रारी केल्याने भोजन पुरवठादाराचा ठेका बंद करुन, नविन भोजन पुरवठाधारकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. साफसफाई संदर्भात संबंधित कंपनीस नोटीस देण्यात येऊन संबधित कर्मचाऱ्यांना बदलण्यात आलेले आहे.तसेच वसतीगृहांच्या नियमित कामकाजात हलगर्जीपणा केल्याबाबत संबंधित गृहपालांना निलंबित करण्यात आलेले आहे.

NO 1H 1 H 1 1299 (750-1.2014)-) (क्र.मा. पृ.

२. या तिन्ही वसतीगृहातील विदयार्थ्यांना आक्टोंबर,२०१८ पर्यंत निवार्हभत्ता अदा करण्यात आलेला असून,शैक्षणिक साहित्यापोटी आवश्यक रक्कम विदयार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. तसेच या वसतीगृहांसाठी भोजन समिती स्थापन करण्यात आलेली असून वसतीगृहात भोजन चव नोंदवही ठेवण्यात आलेली आहे.वसतीगृहातील विदयार्थी यांनी मा.लोकप्रतीनिधी तसेच सहायक आयुक्त यांचेसमवेत दि.३०.१०.२०१८ रोजी चर्चा केलेली आहे त्यामध्ये विदयार्थ्यांनी तक्रारी केलेल्या नाहीत. मा.लोकप्रतीनिधी यांचे तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली असून, भोजपुरवठादारावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच साफसफाई कर्मचारी बदलण्यात आलेले आहे, तसेच वसतीगृहांच्या नियमित कामकाजत हलगर्जीपणा केल्याबाबत संबंधित गृहपालाना निलंबित करण्यात आलेले आहे. आजरोजी या वसतीगृहांचे कामकाज सुरळीत चालू आहे.

---

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, संदीप नाईक, अस्लम शेख, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, वैभव पिचड, सुरेश लाड, किसन कथोरे, दिपक चव्हाण, हनुमंत डोळस, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"ठाणे जिल्हयातील मुंब्रा येथील वीजेची समस्या सोडविण्यास महावितरणला अपयश आलेले असल्याने येथील नागरिकांना त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, या भागामध्ये नेहमीच ७ ते ८ तासाचे भारनियमन केले जात असतांना त्या व्यतिरिक्त अतिरिक्त भारनियमन केले जात असून सुमारे १२ ते १४ तास अघोषित भारनियमन केले जात असल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोबर, २०१८ च्या शेवटच्या आठवडयात उघडकीस आलेली असणे, येथील वीज वितरण प्रणाली सुधारण्यासाठी लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरवा करुनही महावितरणकडून योग्य दखल घेतली जात नसणे, उडवाउडवीची उत्तरे दिली जात असणे, महावितरणच्या मुख्य अधिकारी व मुंब्रा विभागाच्या अभियंताकडून येथील वीज पुरवठा सुरळीत करण्यास हेतुपुरस्पर चालढकल केली जात असणे, धार्मिक उत्सवाचा काळातही भारनियमन केले जात असून एमआयडीसी तसेच इतर यंत्रणाकडून पाणी सोडण्याच्या वेळेची वीज बंद केले जात असणे, परिसरातील सुमारे ५००० लोकांनी नवीन वीज जोडणीसाठी शुल्क अदा केलेले असणे, मात्र केवळ मीटर नसल्याने जोडण्या देण्यात आलेले नसणे, परिसरात अनेक ठिकाणी उघडयावर असलेल्या केबलमुळे नागरीकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, येथील वीजेची समस्या सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा. ऊर्जामंत्री तसेच महावितरण प्रशासनाकडे दि. ३०.१०.२०१८ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी मुंब्रा कळवा परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, माहे नोव्हेंबर, २०१८ मधील विधीमंडळाच्या अधिवेशन काळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यास टाळाटाळ केली जात असल्याने परिसरातील नागरीकांना वीज समस्येला सामोरे जावे लागत असणे, महावितरण प्रशासनाचा हेतुपुरस्पर दुर्लक्षामुळे पुढील काळात सदरचा प्रश्न अधिकच गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

वीज उपलब्धतेत वाढ करण्याचा कालबध्द कार्यक्रम योग्यरीतीने अंमलात आणल्याने तसेच वीज वितरणासाठी सक्षम प्रणाली उभारल्याने महावितरणच्या वीज उपलब्धतेत वाढ झाली. त्यामुळे माहे मार्च, २०१६ पासून राज्यात कोठेही भारनियमन केले जात नाही. परंतु गरज भासल्यास फक्त आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये वीजेची मागणी व उपलब्धता यामध्ये तफावत निर्माण झाल्यास वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार, तात्पुरत्या कालावधीसाठी भारनियमन गरजेनुसार लागू करण्यात येते. वीज यंत्रणेमध्ये मागणी व उपलब्धता याची शहानिशा करुन जशी वीजेच्या उपलब्धतेत वाढ होते, तसे भारनियमन टप्याटप्याने मागे घेण्यात येते. तसेच फक्त स्थानिक पातळीवर अचानक काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास वीज पुरवठा खंडीत होतो. अन्यथा ग्राहकांना सुरळीतपणे विद्युत पुरवठा केला जातो.

राज्यात वीजेच्या मागणीत वाढ झाल्याने व वीजनिर्मिती केंद्रांना कोळशाच्या उपलब्धतेत व पुरवठयामध्ये अडचणी येत असल्यामुळे दिनांक ०८/१०/२०१८ पासून वीजेची मागणी आणि उपलब्धता यांमध्ये ताळमेळ घालण्यासाठी तसेच

कि.मा.प.

वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी कमी वसुली व जास्त वीज हानी असलेल्या (५८ टक्क्यांपेक्षा जास्त) 'ग' गटातील अकृषक वाहिन्यांवर काही कालावधीमध्ये दिनांक २५/१०/२०१८ पर्यंत गरजेनुसार तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात आले. सदर कालावधीमध्ये शहरी व गावठाण विद्युत वाहिन्यांवर संध्याकाळी (१८:३० ते २४:०० वाजेपर्यंत) भारनियमन करण्यात आले नाही. तसेच जशी वीजेची उपलब्धता वाढली तसे भारनियमन मागेही घेण्यात आलेले आहे.

ठाणे-३ विभागाची एकूण वीज वितरण हानी एकूण ५० प्रतिशत पेक्षा जास्त आहे. तसेच ठाणे-३ विभागाअंतर्गत मुंब्रा-शिळ परिसरात एकूण १७ वीज वाहिन्या असून त्यापैकी १२ वीज वाहिन्यावरील वितरण व हानी जास्त व वीज वसूली कमी असल्यामुळे सदर वाहिन्यांवर तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात आले.

वीज वितरण प्रणाली सुधारणेसाठी महावितरणकडून योग्य दखल घेतली जाते. वीज पुरवठा व तात्पुरते भारनियमन याबाबत संबंधित परिसरातील नागारिकांना योग्य त्या प्रसिध्दी माध्यमाद्वारे योग्य माहिती देण्यात येते. तसेच वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून हेतूपुरस्पर चालढकल केली जात नाही. धार्मिक उत्सवाच्या काळात या परिसरात भारनियमन केलेले नाही.

ठाणे-३ विभागात पैसे भरून वीज जोडणी न मिळालेल्या ग्राहकांची संख्या ४८०० इतकी असून माहे सप्टेंबर, २०१८ अखेर मुंब्रा उपविभागाकरिता ४७०० एवढे वीज मिटर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यानुसार नविन वीज जोडण्या देण्यात येत आहेत. नादुरुस्त भूमीगत वाहिनीच्या दुरुस्तीनंतर त्या वाहिन्या महानगरपालिकेची रीतसर परवानगी घेऊन जमिनी खालून महावितरण कंपनीमार्फत टाकण्यात आल्या आहेत.

मुंब्रा परिसरात एमएमआरडीए मार्फत रस्ता रुंदीकरणाचे काम व मुंब्रा बायपास ते कल्याण फाटा दरम्यान उड्डाण पुलाचे काम चालू असल्याने रस्त्याचे खोदकाम करण्यात येत आहे. सदर रस्ता बांधकामाच्या कामात अडसर होणाऱ्या वीज वाहिन्या तसेच इतर वीज वहन उपकरणे प्रस्तावित रस्त्याच्या मार्गातून इतर ठिकाणी स्थापित करण्याच्या कामी महावितरणव्दारे वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरुपात बंद करुन दिला जातो. जमिनी खालून टाकलेल्या केबल तुटल्याने तसेच एमएमआरडीएला कामासाठी वीज पुरवठा बंद करुन दिल्याने वीज पुरवठा खंडीत होत आहे. परंतु सदर वीज वाहिन्यातील दोष निवारण करुन वीज पुरवठा पूर्ववत करण्यात येतो. माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये दिनांक ६, १०, १३, १६ व २४ या ५ दिवसांत यासाठी एकूण ९५.३० तासांचे भारनियमन करण्यात आले. मुंब्रा परिसरात अखंडीत वीज पुरवठा चालू ठेवण्यासाठी महावितरण तर्फे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

मुंब्रा परिसरात विविध योजनांतर्गत विद्युत पायाभूत सुविधांची कामे करण्यात आली आहेत. एकात्मिक उर्जा विकास योजना (IPDS) अंतर्गत ६३० के. व्ही. ए. क्षमतेची १८ रोहीत्रे, ४.३० कि.मी. उच्चदाब भूमिगत वाहिनी, १.१० कि.मी. लघुदाब भूमिगत वाहिनी व १६ रिंगमेन युनिट बसविण्यात आले आहेत. तसेच पुर्नरचित उर्जा विकास व सुधारणा कार्यक्रम (RAPDRP) या योजनेअंतर्गत २२/२२ के.व्ही. क्षमतेचे १ स्विचींग केंद्र, २२/११ के.व्ही. २x१० एम.व्ही.ए. क्षमतेचे १ उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले. तसेच ११.८ कि.मी. उच्च दाबाची भूमिगत वाहिनी, ३ कि.मी. उच्चदाब उपरी तार मार्ग, ६ कि.मी. लघुदाब भूमिगत वाहिनी व ७ रिंगमेन युनिट बसविण्यात आले आहे.

कळवा परिसरात विविध योजनाअंतर्गत विद्युत पायाभूत सुविधांची कामे करण्यात आली आहेत. एकात्मिक उर्जा विकास योजना (IPDS) अंतर्गत ६३० के.व्ही.ए. क्षमतेची १२ रोहीत्रे, ७ कि.मी. उच्चदाब भूमिगत वाहिनी व १६ रिंगमेन युनिट बसविण्यात आले. तसेच पुर्नरचित उर्जा विकास व सुधारणा कार्यक्रम (RAPDRP) या योजनेअंतर्गत केलेल्या २२/११ के.व्ही. क्षमतेचे १ खारेगाव उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले. २५.८५ किमी उच्च दाबाची भूमिगत वाहिनी, १ कि.मी. उच्चदाबाची उपरी तार मार्ग, ४.२२ किमी लघुदाब भूमिगत वाहिनी, २.१७ कि.मी. उपरी तार मार्ग लघुदाब वाहिनी व ५ वीज रोहीत्रे बसविण्यात आले आहेत.

*****************

एच- ११००- १अ.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे तृतिय (हिवाळी) अधिवेशन

श्री. संजय कदम, विधानसभा सदस्य, यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे : -

"मौजे नायरी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) हे गाव सह्याद्रीच्या पायथ्याशी वसले असून अत्यंत दुर्गम भागात आहे मात्र येथील ग्रामस्थांकडून सातत्याने मागणी करुनही बौध्दवाडी ते मराठवाडी ह्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण जिल्हा परिषदेकडून अद्याप झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये निदर्शनास येत असणे, या ठिकाणच्या रस्त्याचे काम दिनांक २४ एप्रिल, २०१२ रोजीच्या पत्रानुसार रोहयो विभागाने त्यांच्या योजनेत वगळून जिल्हा वार्षिक योजनेत समाविष्ट केले आहे मात्र त्याला अद्याप मंजूरी मिळाली नसणे, सुमारे तीन कि.मी.च्या या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी एकूण रु. ३९.०० लक्ष इतका निधी आवश्यक असून शासनाकडून अद्यापही सदर निधी उपलब्ध करुन दिला नसणे, या गावात पक्का रस्ता नसल्यामुळे या परिसरातील ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना या रस्त्यावरुन ये-जा करणे अडचणीचे ठरत असल्याचे तसेच रस्त्यावरुन वाहने जाण्याची सोय नसल्याने रुग्णांना लाकडी बांबूला डोली बांधून रुग्णालयात न्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले असणे , याबाबत शासनाने चौकशी करुन या रस्त्याचे खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याची असलेली आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा.मंत्री ग्राम विकास यांचे निवेदन

*** **********************

प्रश्नांकित प्र.जि.मा. ४७ ते नायरी बौध्दवाडी-मराठवाडी या ग्रामीण मार्ग क्र. १३८ रस्त्याची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेप्रमाणे लांबी २.०० कि.मी. आहे. मात्र प्रत्यक्षात २.५०० कि.मी. लांबी आहे. यापैकी ०/०० ते ०/४०० व १/०० ते १/५०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभाग, ०/४०० ते १/०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभाग व १/५०० ते २/५०० कि.मी. लांबी माती(मुरमी) पृष्ठभागाची आहे.

जिल्हा वार्षिक योजना २०१७-१८ ग्राम पंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत सदर रस्त्याच्या सा.क्र.१/०२० ते १/५०० मध्ये खडीकरण व डांबरीकरण करण्यासाठी रु. ७.०० लक्ष मंजूर करण्यात आले आहेत. तसेच या रस्त्याच्या सा.क्र.२/०० मध्ये मोरी दुरुस्ती करणे , वाहून गेलेला रस्ता दुरुस्त करणे तसेच संरक्षक भिंत बांधणे या कामासाठी रु. १०.०० लक्ष सन २०१७-१८ अतिवृष्टी अंतर्गत मंजूर आहेत. वरील दोनही कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

या रस्त्याच्या ०/०० ते १/०० व व १/५०० ते २/५०० कि.मी. मधील रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २०१८-१९ अंतर्गत ०/०० ते १/०० कि.मी. लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

उर्वरीत लांबीच्या रस्त्याचे काम निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न आहेत.

**********

रोटा/एच १२५७ [७००-१२-१८]·

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१८ चे (हिवाळी ) अधिवेशन

सर्वश्री.अतुल भातखळकर, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो.आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यंबकराव भिसे, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ. संतोष टारफे, श्री. अब्दुल सत्तार, ॲड यशोमती ठाकूर, श्री. सुनिल प्रभु, श्रीमती तृप्ती सावंत. श्री.अबू आजमी, ॲड राहुल कुल, श्री.वैभव नाईक विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२७४२१ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईतील जे जे हॉस्पिटल व एस.एल रहेजा हॉस्पिटल या दोन बडया रुग्णालयांमध्ये, किडनी ट्रान्सप्लांट करिता रुग्णांकडून मोठया रकमेची मागणी करुन त्यांना लुबाडण्याचा मोठा घोटाळा माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये निदर्शनास येणे, तसेच रुग्णांना लुबाडणारे हे त्या रुग्णालयातीलच अधिकारी असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, रुग्णालयातील अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज असणे, तसेच मोठया शस्त्रक्रियांच्या बाबत रुग्णांची आर्थिक पिळवणूक होऊ नये म्हणून रुग्णालयांकरीता काही कडक नियमावली करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

**********************

### मा.श्री. गिरीष महाजन, मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे निवेदन

सर ज.जी. समुह रुग्णालय, मुंबई यांच्याकडे एस.एल.रहेजा रुग्णालय मुंबई येथील रुग्ण श्री. जमालुद्दीन खान यांच्या किडनी प्रत्यारोपन शस्त्रक्रियेकरीता शासनाने अधिसुचित केलेल्या सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई या प्राधिकरण समितीची मान्यता मिळवून देण्याकरीता श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई व एस.एल.रहेजा, रुग्णालय, मुंबई येथील समन्वयक श्री. सचिन साळवे, यांनी रुग्णांच्या नातेवाईकांकडून पैशाची मागणी केली होती. दि. १.१०.२०१८ रोजी रुग्णानी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सापळा रचून संबंधितांना रु. ८०,०००/- इतकी रक्कम खाजगी इसमाकडून स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आरोपी लोकसेवक श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक आणि खाजगी इसम श्री. सचिन साळवे यांच्याविरुध्द गु.र.क्र. ३२/२०१८ कलम ७, ७ (अ), १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (दि.२६.७.२०१८ सुधारणा नुसार) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला व सदर गुन्हयात त्यांना दि. १.१०.२०१८ रोजी अटक करण्यात आली असून पुढील कार्यवाही लाचलुचपत विभागाकडून

करण्यात येत आहे. तथापि श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक हे शासकीय कर्मचारी असल्याने त्यांना संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दि. ४.१०.२०१८ च्या आदेशान्वये अटकेच्या दिनांकापासून शासकीय सेवेतून निलंबित केले आहेत.

२. उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्याकरीता संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दि.३.१०.२०१८ च्या पत्रान्वये त्रिसदस्यीय समितीचे गठन केले होते. सदर समितीने झालेल्या प्रकारणाची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल संचालनालयाने दि.२०.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला असून अवयव प्रत्यारोपण प्राधिकरण समितीच्या कामकाजामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी उपाययोजना सुचविलेल्या आहेत. सदर शिफारशीनुसार अंमलबजावणी करण्याचे संचालनालयास निर्देश देण्यात येत आहेत.

३. राज्यामध्ये अवयव प्रत्यारोपणाला प्रोत्साहन देऊन रुग्णांना नवजीवन देण्यासाठी केंद्र शासनाने पारीत केलेला कायदा Transplantation of Human Organs and Tissues Act, १९९४ मधील तरतुदीनुसार १ राज्यस्तरी प्राधिकार समिती व ६ विभागीय / जिल्हा स्तरीय प्राधिकरण समित्या महाराष्ट्र शासनाने दि. १९.१.२०१७ च्या राजपत्रान्वये अधिसुचित केल्या आहेत. सदर समितीचे कामकाज स्थगित करुन उक्त प्रकरणी मान्यता देण्याचे अधिकार राज्य स्तरीय मानवी अवयव प्राधिकरण समितीस देण्याबाबत संचालनालयाने दि. ४.१०.२०१८ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली होती. त्यानुसार मानवी अवयव व ऊती प्रत्यारोपण नियम २०१४ मधील नियम क्र. ११ उपनियम ४ अंतर्गत जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे विभागीय स्तरावर मानवी अवयव प्राधिकरण समितीचे अधिकार काढून घेण्यात आले असून या समितीच्या अधिकार क्षेत्रातील प्रकरणांवर निर्णय घेण्याचा अधिकार तुर्त राज्यस्तरीय प्राधिकरण समितीकडे सुपुर्त करण्यात आला आहे. जे.जे.रुग्णालय, मुंबई येथे विभागीय स्तरावरील मानवी अवयव प्राधिकरण समितीमध्ये बदल करुन नवीन समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

****************

**लक्षवेधी सूचना क्रमांक :-**

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०१८ चे तृतिय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री. सुनिल शिंदे, अबू आजमी, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५अनुसार दिलेली लक्षेवधी सूचना क्रमांक पुढीलप्रमाणे आहे :-

" भिवंडी तालुक्यातील तुंगारेश्वर अभयारण्याच्या खारबाव परिसरातील उंच टेकडीच्या जंगलाला दि. २६/१०/२०१८ रोजी रात्री अचानक आग लागून शेकडो हेक्टर जंगलातील वन संपदेचे झालेले नुकसान, मानवी वन परिक्षेत्रांतर्गत येणा-या या अभयारण्यात अग्निशमन वा लागलेल्या आगिवर नियंत्रण मिळविण्यासाठी कोणतीच अत्याधूनीक यंत्रणा व उपाययोजना नसणे, वन विभागाच्या अधिका-यांची अग्निशमन यंत्रणा व उपाययोजना करण्यास झालेले दुर्लक्ष, परिणामी वन संपदेचे आगीमध्ये मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने पर्यावरणाचा झालेला -हास, त्यामुळे पर्यावरण प्रेमी व वृक्ष झोपासना प्रेमी यांच्यात वन विभाग प्रशासनाबाबत तीव्र असंतोष, राज्याच्या वनमंत्री महोदयांनी या गंभीर प्रकरणी तात्काळ चौकशी करुन आवश्यक असलेल्या उपाययोजना निर्मितीबाबत वन अधिका-यांना तात्काळ आदेश देण्याची आवश्यकता वा प्रतिक्रिया."

---

**श्री.सुधीर मुनगंटीवार** मंत्री (वने)

निवेदन

तुंगारेश्वर अभयारण्याच्या खारबाव परिसरात दिनांक ३०/१०/२०१८ रोजी क.नं. ११२८ मध्ये अंदाजे ४ हेक्टर जळाले असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर आगीमध्ये मोठया वृक्षांचे नुकसान झालेले नसून, पालापाचोळा व सुकलेले गवत जळालेले आहे. सदर प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ व वन्यजीव (संरक्षण), अधिनियम १९७२ चे कलमानुसार वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वन वणव्यांच्या घटनांना आळा बसणेकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहे :-

- आग प्रतिबंधक योजना तयार करण्यात आली असून, त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.
- सर्व वनक्षेत्रावर जाळरेषा घेतल्या जातात.
- वनवणवा हंगामामध्ये वनकर्मचारी/ अधिका-यांच्या गस्तीचे प्रमाण वाढविण्यात येते.
- लोक प्रबोधनासाठी मोकयाच्या ठिकाणी आगी लावु देवू नये म्हणून फलक लावण्यात येतात.
- प्रत्येक वनक्षेत्रात अतिरिक्त वनमजुर दिवसपाळीत आगरक्षक म्हणून नेमले जातत. त्याचप्रमाणे रात्रीच्या वेळी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात आग लागल्यास विझविणेकामी ३ ते ४ मोक्याच्या ठिकाणी साहित्यांसह २० जणांचे पथक दक्ष असते.
- अशासकिय स्वयंसेवी संस्थांचा सहभाग या काळात जागरुकता अभियान व प्रत्यक्ष आग विझवायला लागणारी मदत यासाठी घेण्यात येते.
- त्याचप्रमाणे चालु वर्षी संबंधीत स्टॉफला अत्याधुनिक फायर बीटर्स, फायर रेकस, फायर प्रुफ युनीफॉर्म, शॉवेल, ईत्यादी साहित्य देऊन आग विझविणेकामी देण्यात येते.

ROTA/H 1143(750-12-2018)

*******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०१८ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अस्लम शेख, सुनिल केदार, अमर काळे, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, अब्दुल सत्तार, डी.पी.सावंत, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. कुणाल पाटील, बाळासाहेब थोरात, श्रीमती. निर्मला गावित, सर्वश्री. नितेश राणे, कालीदास कोळंबकर, अबू आजमी, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"दारुबंदी असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध दारु विक्री सुरु असणे, यात महिन्याकाठी करोडो रुपयांची अवैधरित्या उलाढाल होत असून अनेक पोलीस ठाण्यातील अधिकारी व पोलीसांना राजरोसपणे हप्ते मिळत असणे, मात्र यात काही प्रामाणीक पोलिस अधिकाऱ्यांचा बळी जात असल्याची घटना चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालूक्यात उघडकीस येणे, दारुबंदी असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात भंडारा जिल्ह्यातील पवनी येथून तोरगावमार्गे मोशी रस्त्याने दारुची अवैध वाहतूक नेहमीच होत असून नेहमी प्रमाणे दिनांक १३ नोव्हेंबर २०१८ रोजी दारुची अवैध वाहतूक होणार असल्याची माहिती नागभीडचे प्रभारी ठाणेदार छत्रपती चिडे यांना मिळाली असता त्यांनी क्षणाचाही विचार न करता तात्काळ पोलीस उपनिरिक्षक ए.एस.मलकापूरे, पोलीस शिपाई संदीप कोवे, पितांबर खरकाटे आणि रामकृष्ण बोधे यांना सोबत घेऊन मोशीकडे निघणे, मोशीकडे जात असतांनाच दारु माफीयांची स्कॉर्पिओ गाडी दृष्टीस पडताच त्यांनी गाडीचा पाठलाग सुरु केला असता मोशीजवळील गोसेखुर्द नहराजवळ समोरुन येणाऱ्या ट्रक्टरला स्कार्पिओ गाडीने धडक दिल्याने दारुची वाहतूक करणारी गाडी थांबली असता खाजगी वाहनातून पाठलाग करणारे पोलीस गाडीतून खाली उतरुन त्या गाडीकडे पायी जात असतांना दारु माफीयांनी आपली स्कार्पिओ गाडी जोराने रिव्हर्स घेऊन पोलिसांच्या अंगावर आणल्याने त्यात कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिकपणे चोख कामगिरी करणारे नागभीड पोलीस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार छत्रपती चिडे यांच्या अंगावरुन गाडी चालवून त्यांना जागीच ठार करुन ती गाडी सुसाट वेगाने पळून जाणे, या गंभीर घटनेमूळे पोलिस विभाग दहशतीखाली येणे, काही पोलिसांच्या हप्तेखोरीमूळेच पोलिसांचा धाक दारु तस्करावर नसून उलट दारुतस्करांनी आपली दहशत पोलिस विभागात निर्माण केली असणे, सदर घटना घडून चार दिवस झाले असतांना सुध्दा अद्यापही स्कॉर्पिओ गाडीसहीत मुख्य आरोपींचा पत्ता पोलिसांना लागलेला नसणे, त्यामूळे पोलिसांच्या तपास यंत्रणेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होणे, जेंव्हा पासून चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी लागू करण्यात आली तेंव्हापासून तर आजपर्यंत चंद्रपूर पोलिस विभागाच्या अधिकृत आकडेवारीनुसार २७ हजार १३५ आरोपींना अटक करण्यात येणे, २५ हजार ३३६ हजार दारुबंदी उल्लंघनाचे गुन्हे दाखल करण्यात येणे, ६५ हजार करोड रुपयांची ७ लाख ८० हजार लिटर दारु जप्त करण्यात येणे, १४० कोटी रुपयांचे मुदेमाल जप्त करण्यात येणे, हे सरकारी आकडे असले तरी प्रत्यक्षात या पेक्षाही किती तरी पटीने जास्त असणे, त्यामूळेच, चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी योजनाच फसलेली असल्याची चर्चा लक्षवेधीच्या माध्यमातून नुकत्याच झालेल्या नागपूर येथील पावसाळी अधिवेशनात चर्चा होणे, असे असतांना सुध्दा दारुबंदी असलेल्या चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यात खुलेआम राजरोसपणे अवैधदारुची तस्करी होऊन दामदुपटीने विक्री होणे, या घटनेमूळे प्रामाणिक पोलीस अधिकारीच सुरक्षीत नसेल तर दारुबंदी जिल्ह्यातील हजारो महिला व नागरिकांच्या सुरक्षेचे काय असा गंभीर प्रश्न जनमाणसात निर्माण होणे, मुजीर जिंदावली शेख राहणार बलारशा जिल्हा चंद्रपूर यांनी बलारशा परिसरातील अवैध दारुविक्रीच्या संदर्भात लेखी तक्रार पोलिस स्टेशन बलारशा येथे दिली असता तेथील ठाणेदार प्रदिप शिरस्कर यांनी दारु माफियांविरुध्द कारवाई न करता त्यांच्याकडून लाखो रुपये वसूल करुन तक्रारदार मुजीर जिंदावली शेख यांच्यावरच खोटी कारवाई करुन दिनांक

१७/५/२०१८ रोजी अपराध क्र.५५९/१८ नुसार गुन्हा दाखल करुन अटक करणे, या घटनेमूळे काही पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दारुमाफियांसोबत साटेलोट असल्यानेच चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध दारुची विक्री होणे, त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी प्रामाणिक व कर्तव्यदक्ष काम करणाऱ्या नागभीडचे प्रभारी ठाणेदार छत्रपती चिडे यांना शहिदांचा दर्जा देऊन त्यांच्या परिवारातील सदस्याला तातडीने शासकीय नोकरी व मुख्यमंत्री सहायता निधीमधून पंचविस लाख रुपये आर्थीक मदत देण्याबाबत तसेच या गंभीर प्रकरणी आरोपींना तातडीने अटक करणे तसेच या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन दारुबंदी जिल्ह्यात अवैध दारु पुरवठा व अवैध दारु विक्री होणार नाही याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्हा दि. १.४.२०१५ पासून दारूबंदी म्हणून घोषित करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्हयात संपुर्णपणे दारूबंदी असल्याने दारूबंदीची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याकरीता दि. १.४.२०१५ पासून चंद्रपूर पोलीस दलाकडून दारूबंदी मोहीम राबविण्यात येत आहे. चंद्रपूर जिल्हयात अवैध दारू विक्री आणि वाहतुकीबाबत दिनांक १.४.२०१५ ते ३१.१०.२०१८ या कालावधीत एकूण २८,३८८ केसेस करण्यात आल्या असून १,५९,७७,७४,३५८/- रूपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील पोलीस स्टेशन नागभीड येथील पोलीस उप निरीक्षक छत्रपती चिडे आणि त्यांच्या सहकार्यांना ढोरपा-मौशी रस्त्यावर अवैध दारू वाहतुक होत असल्याची माहीती मिळाली होती त्या माहीतीची पडताळणी करण्याकरीता पोलीस उप निरीक्षक छत्रपती चिडे आणि त्यांचे सहकारी घटना स्थळावर गेले असता तेथे एका पांढऱ्या स्कॉर्पिओला त्यांनी थांबण्याचा इशारा केला असता त्या गाडी चालकाने गाडी न थांबवता पळून जाण्यासाठी कर्तव्यावर असलेल्या पोउनि चिडे यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या अंगावर गाडी घालून त्यांना जखमी केले. सदर घटनेत पोउनि चिडे यांचा मृत्यू झाल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी २० आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन, नागभीड येथे गुन्हा क्र.४३९/२०१८ वर भादंवि कलम ३०२, ३०७, ३५३, ३३२, ३३३, १२०(ब) सहकलम ६५(अ), ८२, ८३ मुंबई दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करून मुख्य आरोपीसह २० आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्हा तपासावर आहे.

भंडारा जिल्ह्यात माहे एप्रिल २०१५ पासून दारुबंदी घोषित करण्यात आली आहे. एप्रिल २०१५ ते दि.३१/१०/२०१८ पर्यंत एकूण ५४७७ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४१५५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर ६,१३,०७,४,३९/- रुपये इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मुंबई दारूबंदी कायदा कलम ९३ नुसार १५५५ गुन्हे दाखल आहेत. मुंबई पोलीस कायदा कलम ५६ नुसार ४४ गुन्हे दाखल आहेत तर एमपीडीए खाली ०७ प्रस्ताव दाखल आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यात पोलीस दलातर्फे दिनांक १/४/२०१५ ते ३१/१०/२०१८ या कालावधीत एकूण २८,३८८ केसेस दाखल करण्यात आल्या असून ३०,४०४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. १,५९,७७,७४,३५८ रु.ची मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे. मुंबई दारूबंदी कायदा कलम ९३ नुसार ३९९२ व मुंबई पोलीस कायदा कलम ५६ नुसार २४० केसेस दाखल आहेत तर २९ एमपीडीए प्रस्ताव सादर केले आहेत. एकूण १६ आरोपींना जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्याचा सिमेलगत असलेल्या जिल्ह्यातील ८ अनुज्ञाप्ती धारकांचे परवाने निलंबित केले आहेत.

गडचिरोली जिल्हा २ ऑक्टोबर १९९२ पासून दारुबंदी जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. गडचिरोली जिल्ह्यात सन २०१५ ते ऑक्टोबर २०१८ अखेर पर्यंत एकूण ६,६६८ केसेस दाखल करण्यात आल्या असून ८,३९३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. २३,७९,३५,४१० रु.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मुंबई दारूबंदी कायदा कलम ९३ नुसार ६६७ व मुंबई पोलीस कायदा कलम ५६ नुसार ३२ केसेस दाखल आहेत तर ६ एमपीडीए प्रस्ताव सादर केले आहेत.

वर्धा जिल्हा १९७५ पासून दारुबंदी जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. वर्धा जिल्ह्यात सन २०१५ ते ऑक्टोबर २०१८ अखेर पर्यंत एकूण ४२,७०५ केसेस दाखल करण्यात आल्या असून ४४,८९९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. ५९,४५,६८,३२७ रु.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मुंबई दारूबंदी कायदा कलम ९३ नुसार ४४९० व मुंबई पोलीस कायदा कलम ५६ नुसार ८ केसेस दाखल आहेत तर ७ एमपीडीए प्रस्ताव सादर केले आहेत.

चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली जिल्हयातील मद्यविक्रीच्या व्यवसायात गुंतलेल्या सराईत गुन्हेगारांविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा , १९४९ मधील कलम ९३ नुसार चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्यात येतात. राज्यातील चंद्रपूर जिल्हयाच्या लगतच्या जिल्हयातून तसेच तेलंगणा राज्यातून मद्याची चोरटी आवक होणार नाही यासाठी मुख्य व इतर मार्गावर गस्त घालण्यात येते तसेच नाकाबंदी करून वाहनांची तपासणी देखील करण्यात येते.

शासन परिपत्रक , गृह विभाग क्र. सीआरएम-२०१७/प्र.क्र. ७१/पोल-१३, दि. ०१ मार्च, २०१७ अन्वये अवैध दारू विक्री, निर्मिती व इतर संलग्न बाबी संदर्भात करावयाच्या कारवाई बाबत सविस्तर निर्देश पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत.

दिनांक १७/५/२०१८ रोजी पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे दाखल गु.र.नं. ५५९/१८ च्या तपासात सदर गुन्हयात अटक आरोपीने दारूबंदीचे उल्लंघन करून त्याच्या वाहनातून अवैध दारू वाहतूकीमध्ये सहभाग आढळून आल्याने शेख जिंदावली यास अटक करण्यात आली. चंद्रपूर जिल्ह्यात क्राईम रजिस्टर उताऱ्या वरुन शेख मुजीर जिंदावली याच्या विरुध्द १९९८ मध्ये २, २०१५ मध्ये २, २०१६ मध्ये १, २०१७ मध्ये २ व २०१८ मध्ये २ असे एकूण ९ गुन्हे दाखल आहेत.

पोलीस उप निरीक्षक चिडे यांनी आपला जीव धोक्यात घालून आपले कर्तव्य बजावित होते व संघटीत गुन्हेगारांविरूद्ध कारवाई करत असताना त्यांना मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या कुटूंबियांना शासन निर्णय गृह विभाग क्र. पीडब्लयु-१००८/प्र.क्र. ८/पोल-७, दिनांक २९.११.२००८ अनुसार नक्षलवादी कारवाईसह अतिरेकी कारवाई, दरोडेखोरी, संघटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई व आपात्कालीन काळात मदत करताना मृत व जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटूंबियांना नुकसान भरपाई व इतर सोयी सुविधा लागू करण्यात आल्या आहेत. सदर लाभ दिवंगत श्री. छत्रपती चिडे , पोलीस उपनिरीक्षक यांना एक खास बाब म्हणून गृह विभाग शासन ज्ञापन क्रमांक पीडब्ल्युएफ-२०१८/प्र.क्र. ४४९/पोल-७ , दिनांक ११ डिसेंबर, २००८ अन्वये मंजूर करण्यात आले आहेत.

*****

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री. अतुल भातखळकर, सुनिल शिंदे, भरतसेठ गोगावले, हर्षवर्धन सपकाळ, संदीपानराव भुमरे, अबू आजमी, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. सुभाष भोईर, संजय पोतनीस, डी. पी. सावंत, अमिन पटेल, ऊल्हास पाटील, छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे- पाटील, जितेंद्र आव्हाड, तुकाराम काते, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. सुरेश गोरे, दिपक चव्हाण, अजित पवार, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, संदीप नाईक, अस्लम शेख, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, वैभव पिचड, सुरेश लाड, किसन कथोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील सर्वच सरकारी दवाखान्यांमध्ये औषधांचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याचे माहे, सप्टेंबर २०१८ मध्ये निदर्शनास येणे, तसेच औषध खरेदीत सुसूत्रता येण्याकरिता वैद्यकीय शिक्षण समितीने नेमलेल्या समितीचे काम आरोग्य विभागाने काढून घेऊन ते हाफकिन महामंडळाला दिल्याचे ही निदर्शनास येणे, तसेच महामंडळाच्या नियोजना अभावी ९२६ कोटीच्या औषधांची मागणी असतानाही केवळ १७० कोटींची औषध खरेदी करण्यात आली असणे, त्यामुळे औषधांच्या मागणी पेक्षा कमी औषध खरेदी करण्याची नेमकी काय कारणे असणे, त्यामुळे औषध खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता येण्यासाठी ठोस पाऊले उचलण्याची गरज असणे, तसेच, राज्यातील सरकारी दवाखान्यांमध्ये पुरेसा औषध पुरवठा उपलब्ध करून देण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दि.२६ जुलै, २०१७ अन्वये स्थापन झालेल्या व दि.१५ ऑगस्ट, २०१७ पासून कार्यान्वित झालेल्या सदर खरेदी कक्षाचे काम सुरळीतपणे सुरु असून महाराष्ट्रातील आरोग्य संस्थांमध्ये औषधांचा मागणीनुसार पुरवठा करण्याचे काम सदर खरेदी कक्षाकडून व्यवस्थितरित्या पार पाडण्यात येत आहे. तरी कक्षाकडून आजपावेतो पार पाडलेल्या कामाचा संक्षिप्त गोषवारा खालीलप्रमाणे आहे :-

औषधांकरीता १०९७, उपभोग्य वस्तुकरीता ४१२, यंत्रसामुग्रीकरीता ५६२ व इतर

बाबीकरीता ०१असे एकूण २०७२ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. हाफकिन खरेदी कक्षाच्या स्थापनेपासून औषधांकरीता ९३३, उपभोग्य वस्तूकरीता ४०५, यंत्रसामुग्रीकरीता ५०० व इतर बाबीकरीता ०१ अशा एकूण १८३९ बाबींकरीता निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. औषधांच्या ५३३, उपभोग्य वस्तूंच्या ११५ व यंत्रसामुग्रीच्या ४८ अशा एकूण ६९६ पुरवठा आदेश हाफकिन खरेदी कक्षामार्फत निर्गमित करण्यात आले आहेत. यापुढे प्रसिध्दीस येणाऱ्या निविदांपैकी औषधांच्या १६४, उपभोग्य वस्तूंच्या ०७, यंत्रसामुग्रीच्यी ६२ अशा एकूण २३३ निविदा टप्प्याटप्प्याने प्रसिध्द करण्यात येणार आहेत. निविदा मान्यता समितीच्या २८ बैठका झालेल्या आहेत. उर्वरित मंजूर रकमांचे पुरवठा आदेश मागणीप्रमाणे निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

संचालनालय, आरोग्य सेवा यांच्यांकडून रु.३३६.६८ कोटींचे अनुदान खरेदी कक्षाला प्राप्त झाले असून, त्याअनुषंगाने रु.३८०.२४ कोटींचे पुरवठा आदेश देण्यात आले आहेत आणि संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्यांकडून रु.२३९.०५ कोटींचे अनुदान खरेदी कक्षाला प्राप्त झाले असून, त्याअनुषंगाने रु.७४.८३ कोटींचे पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

खरेदी कक्षाच्या कामासाठी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि संचालनालय, आरोग्य सेवा यांच्याकडून ३७ अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा खरेदी कक्षाकडे प्रत्यार्पित झाल्या आहेत. त्याव्यतिरिक्त निविदा प्रक्रिया अधिक जलद गती वाढण्याच्या हेतून करीता होण्याच्या दृष्टीने बायोमेडीकल इंजिनिअर्स व फार्मासिस्ट यांच्या सेवा बाह्यस्त्रोतामार्फत घेण्यासाठी कंपनीस कार्यादेश निर्गमित करण्यात आले असून त्यांच्याकडून आजपावेतो खरेदी कक्षात १० फार्मासिस्टच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. तसेच त्यांना खरेदी संदर्भातील प्रशिक्षण देऊन खरेदी कक्षाचे कामकाज अधिक गतिमान करण्यात येत आहे.

*******************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**सर्वश्री.सुनिल शिंदे, सुनिल प्रभू, सुरेश गोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी पुढीलप्रमाणे:-**

**खुल्या बाजारात विक्रीसाठी बंदी घातलेल्या पोलिओ लसींची सर्रास विक्री करणाऱ्या सहा मेडिकल व्यावसायिकांवर नाशिक जिल्ह्यातील सरकारवाडा पोलीस ठाण्यात दि.०६/११/२०१८ रोजी दाखल झालेला गुन्हा, हैद्राबाद येथील शांथा बायोटेक्निक्स हि कंपनी करीत असून या कंपनीने उत्पादीत झालेला सर्व माल राज्य शासनाकडून खरेदी करण्यात येणे, तरीदेखील नाशिकसह अहमदनगर आणि औरंगाबाद येथील खुल्या बाजारात या लसीचा साठा पोलिसांकडून जप्त करण्यात येणे, सदरहू जप्त केलेला लसींचा साठा बनावट असल्याचा अहवाल हैद्राबाद येथील उत्पादक कंपनीने दिल्याने या प्रकरणातील वाढलेला गुंता, पोलिस आणि अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या प्राथमिक प्राथमिक तपासात आतापर्यंत या लसीच्या २००० बाटल्या वितरीत करण्यात आलेल्या असून त्यातील बहुतांश बाटल्या ग्राहकांपर्यंत पोहचलेल्या असणे, त्यामुळे चुकीच्या लसीकरणामुळे लहान मुलांच्या जीवीतास निर्माण झालेला धोका, यास्तव सदर प्रकरणाचे गांभीर्य जाणून तातडीने सखोल चौकशी करुन या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत, तसेच या लसींच्या अवैध बाजारास तातडीने आळा घालण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रीया.**

**********

## मा. मंत्री(अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

दि.३१.१०.२०१८ रोजी मे.शांथा बायोटेकनिक्स प्रा.लि.हैद्राबाद, तेलंगणा या Shan IPV (Inactivated Poliomyelities Vaccine I.P.) या औषधाच्या उत्पादक कंपनीचे व्यवस्थापक यांनी सहआयुक्त (औषधे), औरंगाबाद यांच्या कार्यालयात भेट देवून त्यांची कंपनी Shan IPV (Inactivated Poliomyelities Vaccine I.P.) या औषधाची निर्मिती करुन संपूर्ण साठा फक्त मिनिस्ट्री ऑफ हेल्थ, यांना विक्री / पुरवठा करीत असून खुल्या बाजारात विक्री / पुरवठा करीत नसल्याचे सांगितले. तसेच त्यांनी शिवांश फार्मा, नाशिक या वितरकाकडे सदर औषधाचा साठा विक्रीसाठी असल्याचे व सदर साठ्यावरील लेबलवर रु.२१००/ एमआरपीचे लेबल लावण्यात आल्याचे निदर्शनास आल्याचे कळविले आहे. तसेच सदर साठा मे.शिवांश फार्मा नाशिक यांना मे.श्रीअरीहंत केमिस्ट, औरंगाबाद या पुरवठादाराने पुरवठा केल्याचे कळविले आहे.

सदर माहितीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाने मे.श्रीअरीहंत केमिस्ट, औरंगाबाद यांचेकडे चौकशी केली असता मे.श्री.अरीहंत केमिस्ट यांना २.५ ml/५ dose, Poliomyelitis Vaccine (Inactivated) I.P. Shan IPV .Mfg. by-M/s. Shantha Biotechnics Pvt.Ltd. Batch no-IPQ०१८A१७, Mfg Dt-Aug-२०१७, Exp.Dt.-Jul-२०१९ MRP-२१००/- असा लेबल असलेल्या औषधाचा २०० व्हायल्सचा साठा मे.रोशन मेडीकल स्टोअर्स, राहूरी यांनी बिल दि.१९.०९.२०१८ अन्वये ५० व्हायल्स, दि.२१.०९.२०१८ अन्वये ५० व्हायल्स, दि.१८.१०.२०१८ अन्वये १०० व्हायल्सचा साठा पुरवठा केला असल्याचे आढळून आले. मे.रोशन मेडीकल स्टोअर्स, राहूरी यांनी सदर २०० व्हायल्सचा साठा मे.श्री.इंटरप्रायजेस ॲण्ड मेडीकल स्टोअर्स,

अहमदनगर यांच्याकडून खरेदी केला असल्याचे कळविले आहे. तर मे.श्री.इंटरप्रायजेस ॲण्ड मेडीकल स्टोअर्स, अहमदनगर यांनी सदर साठा मे.दि.मेडीकेअर वर्ल्ड, अहमदाबाद, गुजरात यांच्याकडून विनाबिलाने खरेदी करुन मे.रोशन मेडीकल स्टोअर्स, राहूरी, अहमदनगर यांना विक्रीसाठी दिल्याचे मान्य केले आहे.

उक्त साठ्यापैकी मे.श्रीअरीहंत केमिस्ट, औरंगाबाद यांनी मे.शिवांश फार्मा, नाशिक यांना त्यांचे बिल दि.२०.०९.२०१८ व दि.२४.०९.२०१८ अन्वये प्रत्येकी ५० व्हायल्स असा एकूण १०० व्हायल्सचा साठा विक्री केल्याचे व उर्वरीत १०० व्हायल्स मे.श्रीअरीहंत केमिस्ट यांच्याकडे विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे आढळून आले. सदर १०० व्हायल्सचा साठा नियम १५ अन्वये प्रतिबंधित करण्यात आला आहे. तसचे सदर प्रतिबंधित साठा चाचणीस्तव ०४ भागात विभागून चाचणीस्तव घेण्यात आला आहे. सदर विश्लेषण अहवाल अद्याप अप्राप्त आहेत. सदर व्हॅक्सीनची औरंगाबाद जिल्ह्यात कोठेही विक्री झाली नसल्याचे अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या चौकशीत आढळून आले आहे.

सदर प्रकरणी कोणत्याही रुग्णास प्रतिक्रीया आढळून आलेली नाही. तसेच सदर औषध बनावट असल्याचेही प्रशासनाने केलेल्या चौकशीत आढळून आलेले नाही. पोलिसांनी सदर लसीचा साठा जप्त केलेला नाही. उत्पादकाने सदर औषध बनावट असल्याची शंका व्यक्त केली आहे. मात्र त्यांसदर्भात कोणताही पुरावा उत्पादकाकडून किंवा इतर तपासात प्राप्त झालेला नाही. तसेच लसीच्या २००० बाटल्या वितरीत करण्यात आल्याचे व त्या बहुतांश बाटल्या ग्राहकांपर्यंत पोहचल्या असल्याचे तपासात आढळून आलेले नाही. या औषधाद्वारे करण्यात आलेल्या लसीकरणामुळे लहान मुलांच्या जिवितास धोका असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही. राज्य शासनाने सदर औषधाचा साठा उत्पादक किंवा वितरकाकडून खरेदी केलेला नाही. सदर औषध उत्पादक केंद्र शासनासाठी उत्पादन करीत असल्याचे उत्पादकाने कळविले आहे.

अन्न व औषध प्रशासनाने उक्त प्रकरणी राज्यातील वर नमुद पुरवठादारांना कारणे दाखवा नोटिस बजाविण्यात आली आहे. तसेच दि.०५.११.२०१८ रोजी सरकारवाडा पोलिस ठाण्यात संबधित पाच संस्थेतील ६ व्यक्तिविरुध्द व इतर अज्ञात व्यक्ती व संस्थेविरुध्द भारतीय दंड विधान संहितेतील कलमांच्या उल्लंघनासंदर्भात प्रथम खबर अहवाल नोंदविला असून त्याची नोंद गुन्हा क्र.आय-३७३/१८ घेण्यात आली आहे. याबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा गृह विभाग

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**सर्वश्री. अजित पवार,दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर,राणा जगजितसिंह पाटील,हनुमंत डोळस, श्रीमती दिपिका चव्हाण,सर्वश्री. संदीप नाईक,हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, वैभव पिचड,पांडुरंग बरोरा, राहुल जगताप,दत्तात्रय भरणे, दिपक चव्हाण, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री पंकज भुजबळ, नरहरी झिरवाळ, सुरेश लाड, विजय भांबळे,भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर, संजय कदम, बाळासाहेब पाटील, मकरंद जाधव-पाटील,डॉ. मधुसुदन केंद्रे, सर्वश्री- बबनराव शिंदे, दिलिप सोपल, शिवेंद्रसिंहराजे भोसले, मनोहर नाईक, संग्राम जगताप, सर्वश्रीमती सुमन पाटील, ज्योती कलानी, सर्वश्री. अवधूत तटकरे, प्रदीप जाधव-नाईक, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री. अमीन पटेल, राधाकृष्ण विखे-पाटील, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेटटीवार, अस्लम शेख, कालीदास कोळंबकर, मो. आरीफ नसीम खान, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमित देशमुख, डॉ. संतोष टारफे, श्री.कुणाल पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, श्रीमती निर्मला गावित, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. भारत भालके, बाळासाहेब थोरात, संग्राम थोपटे, अब्दुल सत्तार, अमित झनक, विश्वजित कदम, बसवराज पाटील, शेख आसिफ शेख रशिद,त्रंबकराव भिसे, नितेश राणे, भाऊसाहेब कांबळे, मधुकरराव चव्हाण, डी. पी. सावंत, अमर काळे, सुनिल केदार, हर्षवर्धन सपकाळ, डी.एस.अहिरे, अबु आझमी वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे :-**

"राज्यातील तरुणींना परदेशातील हॉटेलमधील चांगल्या नोकरीचे आमीष दाखवून त्यांना परदेशात पाठवून त्यांना जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करायला लावणा-या मानवी तस्करांना मुंबई पोलीसांनी दिनांक ३० ऑक्टोबर,२०१८ रोजी वा त्यासुमारास केलेली अटक, या तस्करांनी ३० हून अधिक तरुणींना फसवून बहरीन व अन्य आखाती देशात पाठविण्यात येणे, आखाती देशात गेल्यानंतर या तरुणींकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करुन घेण्यात येत असणे, याबाबत आणखी किती तरुणींना या व्यवसायात ओढण्यात आले याबाबत चौकशी करण्याची व त्या तरुणींना परदेशातून परत आणण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

**घटना क्र.१**

माहे जुलै २०१८ ते २२/१०/२०१८ या कालावधीत यातील निष्पन्न आरोपीतांनी बळीत मुलीस आपआपसात संगनमत करुन परदेशात चांगले काम देतो असे अमिष दाखवून तिचा पासपोर्ट काढून तिस परदेशात नेले व वेश्यागमनास भाग पाडून तिची फसवणूक करुन तसेच तिला भारतात यायचे असतानाही तिला येवू दिले नाही व ठार मारण्याची धमकी देऊन, फिर्यादीकडून २ लाख घेतले व बळीत मुलीस वेश्यागमनास भाग पाडले व मिळणा-या उत्पनातून त्यांची उप जिवीका भागवली म्हणून दिनांक २६.१०.२०१८ रोजी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हे प्रकटीकरण शाखा,मुंबई गु.र.क्र. ६८/२०१८ कलम ३८७,४२०,३७० (१),३४ भादंवि सह ४,५,६ पिटा ॲक्ट व (नागपाडा पोलीस ठाणे गु.र.क्र.४७९/२०१८ ) अन्वये सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील निष्पन्न आरोपींपैकी आरोपी क्र.१ व २ यांना दिनांक २७.१०.२०१८ रोजी व आरोपी क्र.३ यास दिनांक २८.१०.२०१८ रोजी अटक करण्यात आली होती. अटकेदरम्यान आरोपीतांकडून एकुण ५२ महिलांचे पासपोर्ट हस्तगत करण्यात आलेले असून आरोपीतांनी भारताबाहेर पाठविलेल्या ३८ महिलांची माहिती मिळालेली आहे. सदर महिलांशी संपर्क साधण्यात आला असून त्यांच्याकडे पुढील चौकशी सुरु आहे. अटक आरोपींना अनुक्रमे दि. ०२.११.२०१८ दि.०६.११.२०१८ व नंतर ०८.११.२०१८ रोजी पर्यंत १३ दिवस व १२ दिवस पोलीस कोठडी देण्यात आली होती. तसेच या गुन्हयातील पाहिजे ३ आरोपी हे बहरीन, दुबई येथे असल्याचे निदर्शनास

आले असून त्यांना लवकरात लवकर अटक करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न चालु आहेत. यासंदर्भात ८ महिलांचे जबाब नोंदविण्यात आलेले आहेत. सदयस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत असून पुढील तपास सुरु आहे.

**घटना क्र.२-**

जुलै २०१८ ते २४.०८.२०१८ या कालावधीत यातील अटक कोरीयोग्राफर महिला आरोपी व पाहिजे आरोपी यांनी आपआपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षिदारांना डान्स करण्यासाठी परदेशात पाठवितो असे सांगुन केनिया देशातील नैरोबी येथे पाठवून तेथे आलेल्या लोकांसोबत शारीरीक संबध व वेश्यागमन करण्यास सांगुन व तसे न केल्यास जीवे मारण्याची अथवा अंमली पदार्थांच्या गुन्हयात अडकवण्याची धमकी देवून फिर्यादीचा पासपोर्ट काढून घेऊन फिर्यादीस भारतात येऊ दिले नाही.तसेच फिर्यादीच्या डान्सवर मिळवलेल्या कमाईचा हिस्सा स्वत:च्या फायदयासाठी वापर केला म्हणुन गुन्हे प्रकटीकरण शाखा,बृहन्मुंबई गु.र.क्र. ८१/१८ ,कलम ३७० (१)(३),३४१,५०६,३४ भा.दं.वि. सह ४,५,६ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदयान्वये (सहार पोलीस ठाणे गु.र.क्र.३४९/२०१८) अन्वये सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयातील महिला आरोपीस दि. १५.११.२०१८ रोजी अटक करण्यात आली असून तीने एकूण ५ मुलींची नैरोबी, केनिया येथे तस्करी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक आरोपी दि. २१.११.२०१८ रोजीपर्यंत पोलीस कोठडीत आहे. या गुन्हयातील एका बळीत साक्षीदार मुलीचा जबाब नोंदविण्यात आला आहे. अन्य बळीत साक्षिदार मुलींचा शोध घेऊन जबाब नोंदविण्यात येत आहेत. यातील पाहिजे दुसरी महिला आरोपी ही सध्या नैरोबी,केनिया येथे असून तिला लवकरात लवकर अटक करण्याचे सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत असून गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

राज्यांत मुंबई शहर,नागपूर शहर, पुणे शहर, ठाणे शहर, नवी मुंबई, सोलापूर शहर, यवतमाळ, बीड, अहमदनगर, कोल्हापूर, ठाणे ग्रामीण व सांगली या १२ घटकांमध्ये स्वतंत्र अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग यांना अनैतिक मानवी वाहतुकीसंदर्भात राज्याचे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. सदर कक्षाव्दारे अनैतिक मानवी वाहतुक व्यापारास प्रतिबंधक करण्यासाठी पाऊले उचलण्यात येत आहेत.

---

H/1115-19

श्री.सुनिल शिंदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा निबम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" दहावीसाठी विषयनिहाय मुल्यमापन योजना आणि कृती आराखडयात महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती आणि संशोधन मंडळ बालभारती कडून दहावीचे अर्धे वर्ष संपल्यानंतर काही गुणबदल सुचविण्यात आल्यामुळे तसेच मराठी, इंग्रजी संस्कृत या भाषीक विषयांच्या प्रश्नपत्रिकांच्या स्वरूपामध्ये बदल करण्याचे परिपत्रक नुकतेच निर्गमित करण्यात आलेले असणे, मात्र आता १० वीचा अभ्यासक्रम जवळपास पुर्ण होत आलेला असताना तसेच शाळांच्या सहामाही परीक्षा संपलेल्या असताना पाठयपुस्तक निर्मिती मंडळाकडून सुचविण्यात आलेल्या सदरहू बदलांविरोधात शिक्षकांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी, या ऐनवेळी करण्यात आलेल्या बदलामुळे शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमधील तणाव वाढण्याची निर्माण झालेली भीती, यावर पुन्हा एकदा विचार करावा अशी करण्यात येत असलेली मागणी, वास्तविक कृती आराखडयातील बदल हे शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीलाच अपेक्षित होते परतू त्याकडे जाणीवपुर्वक झालेले दुर्लक्ष, इतक्या उशीराने आराखडयात बदल करण्याचा निर्णय कशासाठी अशाप्रकारे शिक्षकांनी उपस्थित केलेला प्रश्न व त्या संबधी शालेय शिक्षण मंत्र्यांना सादर केलेले निवेदन, सदरहू मागणीनुषंगाने शासनाने तातडीने ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, केलेली कार्यवाही, करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**श्री. विनोद तावडे, मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांनी करावयाचे निवेदन.**

इयत्ता ९ वी व १० वी (माध्यमिक स्तर) चा अभ्यासक्रम / पाठयपुस्तके / मूल्यमापन योजना याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्याप्राधिकरण), पुणे आणि महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. त्यानुसार माध्यमिक स्तरावरील इ. ९ वी साठी शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून तर इ. १० वी साठी शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार नव्याने करण्यात आलेल्या पाठ्यपुस्तकांचे निर्धारण करण्यात आलेले आहे. पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार असणाऱ्या विविध विषयांच्या संदर्भात विषययोजना व त्यावर आधारीत मूल्यमापन योजनाही निश्चित करण्यात आलेल्या आहेत. याबाबत इ. १० वी संदर्भाने पुनर्रचित अभ्यासक्रम, विषययोजना, मूल्यमापन योजना व तासिका नियोजनाबाबत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्याप्राधिकरण), पुणे यांच्यामार्फत दि.१४.६.२०१८ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकानुसार प्रत्येक विषययोजना व मूल्यमापन प्रक्रिया सविस्तर करण्यात आलेली आहे.

माध्यमिक स्तरावरील पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार सर्व विषयांसाठी तयार करण्यात आलेल्या मूल्यमापन योजनांची कल्पना माध्यमिक स्तरावर अध्यापन करणारे शिक्षक तसेच विद्यार्थ्यांना यावी यासाठी

महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी शालेय वर्ष सन २०१८-१९ मध्ये मूल्यमापन आराखडा इ. ९ वी व इ.१० वी (भाषा विषय) आणि मूल्यमापन आराखडा इ. ९ वी व इ.१० वी (भाषेतर विषय)अशा स्वरूपात मार्गदर्शक पुस्तिकांची निर्मिती केली आहे. माध्यमिक स्तरावर सर्व विषयांच्या मूल्यमापनासाठी कृतिपत्रिकांचा अवलंब करण्यात येत आहे. सन २०१९ मध्ये होणारी शालांत परीक्षा ही कृतिपत्रिकेच्या आधारे होणारी प्रथमच परीक्षा असल्याने यासंदर्भात विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न मूल्यमापन आराखडयाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे.

मराठी, इंग्रजी व संस्कृत या भाषिक विषयांच्या कृतिपत्रिका आराखडयामध्ये शिक्षकांच्या मागणीप्रमाणे तज्ज्ञांची त्यावर मते घेऊन विद्यार्थी हिताच्या दृष्टीने काही प्रमुख बदल करण्यात आलेले आहेत. कृतिपत्रिकांच्या मूळ ढाच्यामध्ये काहीही बदल केलेला नाही. कृतींची संख्या कमी अधिक करणे अशा स्वरूपाचे बदल असून ते विद्यार्थी हिताचे आहेत. या बदलानुसार पाठ्यपुस्तक मंडळामार्फत दि.३०.१०.२०१८ व दि.१६.११.२०१८ रोजी परिपत्रके निर्गमित करण्यात आलेली आहेत. या परिपत्रकांच्या माध्यमातून शिक्षक तसेच विद्यार्थ्यांपर्यंत कृतिपत्रिकेची माहिती देण्यात आलेली आहे. सहामाही परिक्षेच्या कृतिपत्रिका सोडविताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करणे, कृतिपत्रिका वेळेत सोडविणे अशा अनेक बाबींवर विचार करून विद्यार्थ्यांना त्या उपलब्ध वेळेत व्यवस्थितपणे सोडविता याव्यात या हेतूने उपरोक्त विषयाच्या संदर्भातील बदल करण्यात आलेले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा फायदाच होणार आहे. कृतिपत्रिका सोडविताना विद्यार्थ्यांना वाटणारी भीती कमी व्हावी, विद्यार्थ्यांनी कृतिपत्रिका कशी सोडवावी याबाबत राज्य स्तरावरील तज्ज्ञांना काय वाटते यासाठी सराव कृतिपत्रिका ऑनलाईन (Online) माध्यमातून देण्यात येत आहेत. त्यांच्या संक्षिप्त उत्तरपत्रिका व त्या कृतिंविषयी तज्ज्ञांच्या मतांचे व्हीडीओ (Video) सुध्दा ऑनलाईन माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येत आहेत. हे केवळ विद्यार्थ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांना अधिकचे मार्गदर्शन केल्याने विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असणारी परीक्षेविषयीची भीती ही निश्चितच नाहीशी होणार आहे.

**********

H-1171-1A

केळशी-उंबरशेत गावाच्या सीमेवर मे. आशापुरा माईन केम कंपनीने कन्वेअर बेल्ट उभारले असून त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र प्राप्त केले आहे तसेच MOEFC यांचेकडून CRZ ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. तसेच सदर कन्वेअर बेल्ट जानेवारी २०१६ पासून कार्यान्वित नाही.

आशापूरा माईनकेम लि. यांच्या खनिज उत्खननामूळे होणारे प्रदूषण व त्याचा परिसरातील शेती व पिकांवर होणारा परिणाम याबाबत जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी संशोधन संचालक डॉ. बाळासाहेब कोकण कृषी विद्यापीठ दापोली, अधिक्षक कृषी अधिकारी, रत्नागिरी, उपविभागीय व तालुका कृषी अधिकारी, दापोली या सर्वांना संयुक्त व समन्वयाने परिसरातील पिकांची पाहणी करुन सदर क्षेत्रातील खनिज उत्खननामुळे निर्मीत धुळीमुळे शेती नापीक होणे, आंबा/काजुच्या मोहरावर, वाढीवर व उत्पादनावर काय परिणाम होतो याबाबत अहवाल सादर करण्याविषयी दिनांक ८/६/२०१६ रोजी सूचीत केले होते. त्यानुसार संशोधन संचालक डॉ. बाळासाहेब कोकण कृषी विद्यापीठ यांनी दिनांक १०/६/२०१६ रोजी वर नमूद अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली असून अहवाल सादर केलेला आहे. सदर क्षेत्रातील खनिज उत्खनन आणि वाहतूक यामूळे आंबा व काजू या पिकावर धूळीचा प्रादुर्भाव व प्रभाव दिसून आला परंतु काजूच्या झाडावर मोहोर व फळधारना झालेली दिसून आली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

खनिज उत्खननामुळे तसेच कन्वेअर बेल्ट व ट्रकद्वारे होणाऱ्या वाहतुकीमुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने घालून दिलेल्या अटी शर्तींचा व पर्यावरण कायद्याचा भंग होतो काय याबाबतही उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्याकडून मागविण्यात आला होता. त्यानुषंगाने उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी पाहणी करुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार कंपनी सर्व अटी व शर्तींचे पालन करीत असून केवळ सदर क्षेत्रात अखंडीत हवा प्रदूषण मोजमाप यंत्रणा न बसवता मॅन्युअल ऑपरेटेड हवा गुणवत्ता मोजणी यंत्रणा बसविली आहे.

खाणपट्टा क्षेत्रात खाणकाम करताना खाणपट्टाधारकाने मान्यताप्राप्त खाणकाम कार्यक्रम योजनेनुसार व मिनरल कॉन्झरवेशन व डेव्हलपमेंट रुल्सच्या नियमांचे तरतुदीनुसार खाणकामासोबतच निसर्गाचा समतोल राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक खबरदारीच्या उपाययोजनाकरुन खाणकाम करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात भारतीय खाण ब्युरो व प्रदूषण नियंत्रण मंडळ यापैकी कोणीही आक्षेप नोंदविलेले नाहीत.

केळशी, उंबरशेत ता. दापोली येथे आशापुरा माईनकेम कंपनीने खाणी खोदल्या असून त्या खाणीचे खोदकाम करताना बेकायदेशीर उत्खनन केले असून त्या ठिकाणी बेकायदेशीर स्फोटकांचा साठा, जिलेटीन (स्फोटक) माहे सप्टेंबर २०१८ मध्ये जप्त केल्याबाबत पोलिस ठाण्यात तक्रार अगर गुन्हा दाखल नाही व सदरची दापोली पोलिस ठाण्याची माहिती निरंक आहे.

तसेच खनिज उत्खनन आणि वाहतूकीमूळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर होणा -या परिणामाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडुन अहवाल घेण्यात आला असून सदर अहवालामध्ये मौजा केळशी, ता. दापोली , जि. रत्नागिरी येथील मायनिंग कंपनीमुळे उडणारी धूळ या विशिष्ठ कारणांमूळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे दिसून आले नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

भारतीय खाण ब्युरो, क्षेत्रिय खाण नियंत्रक, गोवा यांचेकडील दिनांक ०३/०१/२०१८ चे पत्रान्वये मे. आशापुरा माईन केम लि.,मुंबई कंपनीने Financial Assurance ची रक्कम भरलेली नसलेने खाणपट्टयातील खाणकाम बंद करणेचे आदेश दिले आहेत. भारतीय खाण ब्युरो, क्षेत्रिय खाण नियंत्रक, गोवा यांचे आदेशान्वये खाणपट्टयातील खाणकाम पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवणेत आले आहे.

सद्यस्थितीत मौजे उंबरशेत येथील बॉक्साईट उत्खनन व कन्व्हेअर बेल्ट बंद आहे.

---

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

### महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६१.

श्री. संजय कदम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६१ पुढीलप्रमाणे आहे -

"दापोली तालुक्यातील (जि. रत्नागिरी) केळशी-उंबरशेत गावच्या सीमेवर आशापुरा माईनकेम कंपनीने लोकवस्तीलगत बेकायदेशीररित्या कन्व्हेअर बेल्ट उभारले असून कन्व्हेअर बेल्टच्या जागेचा कंपनीने अनधिकृत औद्योगिक बिनशेती वापर केल्याचे निदर्शनास येणे ,या कंपनीने शासनाने निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिकचे व १०० ते २०० फुटांच्या खोल खाणी खोदल्या असून बेकायदेशीर उत्खनन केलेले असून पोलिसांना या ठिकाणी बेकायदेशीर स्फोटकांचा साठा देखील सापडलेला असल्याचे माहे सप्टेंबर , २०१८ मध्ये निर्दशनास येणे, हा बेल्ट उटंबर, केळशी, आतगाव, धायरा, चिचवल गावच्या लोकवस्तीजवळ बसविण्यात आल्याने परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण होऊन स्थानिकांना डोळ्यांचे व घशाचे आजार होत असल्याने व जेवणात ही धूळ जात असल्याने आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असणे , परिसरातील गावांत आशापुरा कंपनी व सब कंत्राटदार गुडेकर माईनिंग यांच्या मार्फत गेली १० वर्षे बॉक्साईटचे अवैध उत्खनन करण्यात येत असून होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील हजारो एकर जमिनीवरील आंबा, काजू इ. पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असणे , उक्त परिसरातून घातक जिलेटीन (स्फोटक) जप्त झालेली असून याचा वापर स्फोटासाठी करण्यात येत असल्याने परिसरातील घरांना तडे गेल्याचे निदर्शनास येणे, या परिसरात पाहणीसाठी आलेल्या तहसिलदार यांच्याकडे ग्रामस्थांनी तक्रारी केल्या असणे, त्यानुसार त्यांनी पाहणी करुन कंपनीस जागेच्या अनधिकृत वापराबाबत दंड आकारला असून कंपनीस उत्खनन थांबविण्याबाबत आदेशित केलेले असून व प्रशासन कंपनीविरूध्द न्यायालयात गेले असून देखील कंपनीचे अवैध उत्खनन आदेशाचे उल्लंघन करुन अद्याप उत्खनन चालूच असणे, प्रशासनाला देखील कंपनी जुमानत नसल्याचे दिसून येत असून याबाबत सखोल चौकशी करण्याची असलेली

आवश्यकता, उत्खनन बंद करण्याच्या व परिसरातील घरांचे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याच्या कार्यवाहीची तसेच संबंधित कंपनीवर कडक कारवाई करुन कंपनीस संरक्षण देणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांवर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (खनिकर्म) यांचे निवेदन

मौजे उंबरशेत, जि. रत्नागिरी येथे ९९.८६ हे. आर. क्षेत्रावर मे. आशापुरा माईन केम लि. यांना बॉक्साईट या खनिजाचा खाणपट्टा मंजूर आहे. सदर खाणपट्टयाची मुदत मार्च, २०५५ पर्यंत आहे. सदर खाणपट्टयामधून खनिज उत्खननाकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. २१/११/२०२० पर्यंत परवानगी दिली आहे. तसेच भारत सरकारच्या पर्यावरण विभागाने दिनांक ३१.१०.२००८ च्या पत्रान्वये खाणपट्टाधारकास ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. भारतीय खाण ब्युरो यांनी सदर क्षेत्राची खाणकाम कार्यक्रम योजना मंजूर केली आहे.

मे. आशापुरा माईन केम लि. यांच्या सदर खाणपट्टयातून उत्पादित बॉक्साईट कन्वेअर बेल्टद्वारा बार्जमध्ये भरण्याकरिता मे . सनराईज मरीन इंटरप्राईजेस यांनी मौजा कोकमंडले , ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे कन्वेअर बेल्टची उभारणी केली आहे . मे. सनराईज मरीन एंटरप्रायजेस यांना जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी दिनांक ३०/०३/२०१५ च्या आदेशान्वये मौजे उंबरशेत तालुका दापोली येथील गट नं. २७६ क्षेत्र ०.०६.०० हे.आर ही शासकीय जमीन बॉक्साईटचे बार्जेसद्वारे वाहतुक करणेकामी कन्वेअर बेल्ट बसविणेसाठी ११ महिने कालावधीकरिता (दिनांक २८/०२/२०१६ पर्यंत) भाडेपट्टा करारान्वये प्रदान करणेत आली आहे . प्रस्तुत मुदत संपल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी दिनांक १८/०१/२०१८ च्या आदेशान्वये दिनांक २८/०२/२०१६ पासून दिनांक २७/०२/२०२१ पर्यंत मुदतवाढ मंजूर केली आहे.

सदर जमिनीत बॉक्साईटचे बार्जेसद्वारे वाहतुक करणेकरिता व कन्वेअर बेल्ट बसविणेकरिता १) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई २) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई ३) केंद्र शासनाचे पर्यावरण व वन मंत्रालय यांची परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्या दिनांक १८.०१.२०१८ च्या आदेशामध्ये नमूद करण्यात आले आहे . त्यानुषंगाने दापोली तालुक्यातील